
# अमृत कुंभ

परमपिता शिव परमात्मा



वर्ष १६ | अंक ३ | ऑगस्ट-सप्टेंबर २०२२ | मूल्य रु. १३/-



पणजी गोवा : विशेष भ्राता नेरी यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. शोभा, ब्र.कु. पूजा व ब्र.कु. एलिना



ठाणे (पूर्व) : योग शिक्षिका नेहा चावला यांना ईश्वरी भेटवस्तू देताना समाजसेविका वीणा भाटीया व ब्र.कु. मीनाक्षी



आदिपुर : आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त कार्यक्रमात योग शिक्षकांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. भारती




अंकलखोप (सांगली) : आत्मनिर्भर शेतकरी अभियान या कार्यक्रमाचे उद्घाटन करताना कृषी अधिकारी भ्राता संभाजी पठकुरे, चेअरमन भ्राता विशाल सूर्यवंशी, ब्र.कु. निवेदिता, ब्र.कु. पद्मा व अन्य




भांडुप (प.) : आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त कार्यक्रमात ईश्वरी संदेश देताना ब्र.कु. छाया, डॉ. भ्राता राम शिंदे, भ्राता रवींद्र काळे



भिलवडी (सांगली) : आत्मनिर्भर शेतकरी अभियान या कार्यक्रमात निवास ठाणे तहसिलदार यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. मीरा, निवेदिता व अन्य

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

# अमृतकुंभ

वर्ष १६, अंक ३. ऑगस्ट – सप्टेंबर २०२२

## अंतरंग




| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय – प्रकाशपुंज | २ |
| २. | ...और बलिहार होकर जाए ! | ४ |
| ३. | दृष्टी पलीकडची सृष्टी (भाग – १) | ५ |
| ४. | शिवसंदेश वाहक 'वीर हनुमान' : दादा आनंदकिशोरजी! | ७ |
| ५. | कर्करोगाशी लढा | ११ |
| ६. | साथ (कविता) | १२ |
| ७. | निश्चिंत जीवनशैली | १३ |
| ८. | ब्रह्मचर्य – एक साधना | १५ |
| ९. | परीकथा (भाग – ५) | १६ |
| १०. | शिकण्यासारखं बरंच काही... | १९ |
| ११. | माझ्या सर्वप्रथम आध्यात्मिक शिक्षिका | २० |
| १२. | जपान डायरी (भाग – २) | २२ |
| १३. | मनुष्य सृष्टीरूपी अविनाशी कल्याणकारी ड्रामा | २३ |
| १४. | तणावमुक्ती | २५ |
| १५. | "आध्यात्मिक प्रकाशस्तंभ दादी प्रकाशमणी" | २७ |


## मुखपृष्ठाविषयी

श्रीकृष्णाच्या चेहऱ्यावर नेहमी स्मितहास्य असे. कितीही कठीण पेचप्रसंग असो; पण त्याचे स्मितहास्य क्वचितच लोप पावले असे वर्णन आढळते. अशीच चर्या प्रकाशमणी दादीजींची कायम असे. शारीरिक क्लेष, परीक्षा येत तेव्हाही त्यांच्याकडे पाहून इतरांना त्या गोष्टींचा सुगावाही लागत नसे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला हा पैलू ठशीव होता व तो अनेकांना प्रेरीत करत असे. ऑगस्ट महिना आल्यावर हसतमुख दादीजीच डोळ्यासमोर येतात. २५ ऑगस्ट २००७ रोजी त्यांनी देह ठेवला; पण आठवणींच्या रूपात त्या आजही सोबत आहेत असे म्हणावेसे वाटते. 'सदैव हसतमुख असणे' हे वैशिष्ट्य आध्यात्मिक दृष्ट्या मनाच्या सत्त्वप्रधानतेचे मोठे लक्षण मानले जाते. यावरून त्यांच्या आध्यात्मिक उंचीचा अंदाज आपणास येतो व तोच प्रेरणादायी ठरतो.

– प्रकाशिका

**फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

Printed, published by B.K.Godavari on behalf of Prajapita Brahmakumaris Ishwariya Vishwa Vidyalaya. Printed at Perfect Prints 22, Jyoti Industrial Estate, Nooribaba Dargah Road, Near Makhmali Talao, Thane (west), pin 400601. Published at Prajapita Brahmakumaris Light House, Wagle Estate, Thane (west), Pin - 400604, Maharashtra. Editor : Mr. Sachin Vinayak Upadhye.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.

संपादकीय ...

# प्रकाशपुंज



'मॅनेजमेंट' या विषयात सम्मीलित केलेली अनेक तत्वें युद्धशास्त्रातून आली आहेत. 'सुन झु' या युद्धशास्त्र निपुण व्यक्तीचे विचार आजच्या मॅनेजमेंटमध्ये वापरले जातात. अशाच प्रकारे पाणबुडीवर काम करणाऱ्या लोकांत आपसांतील संबंध सौहार्दपूर्ण रहावे याकरिता पुष्कळ प्रयत्न केले गेलेत. महिनों महिने पाणबुडी पाण्याखाली असते, जगाशी जणू संपर्क नसल्याप्रमाणेच परिस्थिती असते. अशा वातावरणात, त्याच त्या माणसांचा संपर्क कधी कधी नकोसा वाटू शकतो. माणसं चिडचिडी बनू शकतात. त्यांचे आपसांतील संबंध सुदृढ रहावे याकरिता ICO म्हणजे Inclusion (सामावून घेणे), Control (नियंत्रण) आणि Openness (मोकळेपणा, पूर्वगृह दूषित नसणे) या तीन तत्वांचा प्रामुख्याने विचार करण्यात आला. या विषयावर काम केल्यास पाणबुडीतील कर्मचाऱ्यांचे काम चांगल्या पद्धतीने करता येते हे हळूहळू सिद्ध झाले आणि हेच तत्व मॅनेजमेंटच्या अभ्यासक्रमात आले. मात्र या सगळ्याचा अध्यात्माशी काय संबंध ?

तुकाराम महाराज म्हणत, 'आम्हावरी रोज युद्धाचा प्रसंग.' अध्यात्मात पावलोपावली परीक्षा आहे, युद्ध आहे, संघर्ष आहे, पेचप्रसंग आहे; पण सगळं काही सूक्ष्म पातळीवर आहे. मन–बुद्धीच्या स्तरावर आहे. आपल्यातल्या कमतरता आपल्यासमोर परीक्षा बनून उभ्या राहतात आणि मग शिकलेल्या तत्वांशी झगडा सुरु होतो. जो आदर्श विचार आपण ऐकतो, धारण करायचा प्रयत्न करतो, त्याची कसोटी म्हणजेच युद्ध सुरु होते. दादी प्रकाशमणींनी काही दशकें ब्रह्माकुमारी संस्थेचे कार्य, प्रमुख प्रशासिका या नात्याने सांभाळले. २००७ साली त्यांनी देह ठेवला. मात्र दरवर्षी ऑगस्ट महिना म्हटले की त्यांची आठवण आल्यावाचून राहत नाही. जो माणूस दादीजींच्या संपर्कात थोडा–बहुत आला त्याला तो प्रकाशपुंज कायमचा स्मरणात राहिला. वर उल्लिखिलेल्या मॅनेजमेंटच्या तत्त्वांच्या आधारे दादीजींविषयीच्या काही आठवणी ताडून पाहिल्या तर, त्या तंतोतंत जुळतात. मन थक्क होते.

यज्ञः कर्मसमुद्भवः असे म्हटले जाते म्हणजेच कर्माद्वारे यज्ञ सिद्ध होतो किंवा ज्ञानयुक्त कर्म करणे म्हणजेच यज्ञ होय. दादीजींच्या अनेक कृतींतून याची प्रचिती येते. आबू रोड स्टेशनपासून सहा–सात किमी. वर असणाऱ्या शांतिवन संकुलाची निर्मिती चालू होती तेव्हाची गोष्ट आहे. साधारणपणे १९९५–९६ चा सुमार असावा. अनेक ब्रह्मावत्स साधनेकरिता आणि ईश्वरानुभूतीचा आनंद लुटण्याकरिता येऊ लागले. त्याकाळात मुंबईच्या अनेक सेवाकेंद्रावरील आम्ही नित्य विद्यार्थी सेवाभावाने तिथे जानेवारी–फेब्रुवारीत गेलो होतो. फारसं बांधकाम झालेलं नव्हतं. राहण्याची अगदीच तुटपुंजी व्यवस्था होती. आम्हाला रहायला मिळालेली जागा म्हणजे फक्त पाया बांधून काढलेला चौथरा होता आणि चौथऱ्याच्या बाजूने कॉंक्रिटचे खांब उभे केले होते. थंड वाऱ्यापासून बचाव व्हावा म्हणून चारही बाजूने टारपोलिन बांधले होते. खाली जमिनीवर पेंढा होता. त्यावर आपापले अंथरूण पांघरून आम्ही झोपत असू. दिवसभर सेवा असे मुदपाक खान्यात. त्यामुळे रात्रीच अंथरूणावर पाठ टेकायची संधी असे. अशातच कधी वादळ कधी पाऊसही येऊन गेला आणि बांधलेली कनतान अस्ताव्यस्त झाली. सर्व सेवेकऱ्यांच्या मनांत मात्र अलौकिक उत्साह होता त्यामुळे कुणाच्याही मनांत कुरबूर नव्हती. सकाळचा ज्ञानमुरली वर्ग झाला आणि दादीजींनी अचानक आमच्या राहत्या जागेला भेट दिली. तिथे असणाऱ्या मंडळींची धांदल उडाली. परंतु दादीजींचा भाव होता, 'बघू दे मला, आपले आध्यात्मिक भाऊ लोकं

कसे राहत आहेत. त्यांची काही गैरसोय तर नाही ना !' दादीजींच्या मनातले भाव त्यांच्या डोळ्यातून आणि देहबोलीतून स्पष्टपणे जाणवले. अलौकिक आपुलकीची भावना होती. त्या सहजच म्हणाल्या, "भोपालभाई को मैं कहती हूँ, जरा यहाँ ध्यान दे । ब्र.कु. भूपालभाई, एक ज्येष्ठ भ्राता या व्यवस्थेसंबंधी जबाबदारी निभावत होते. दुपारपर्यंत आम्ही परत येऊन बघतो तर काय ! आमच्या जागेवरची कनताने पुन्हा छान ताणून बांधली होती. रात्रीच्या थंड वाऱ्यापासून जितका शक्य होईल तितका बचाव करण्याची सोय केली होती. जमिनीवरही कनतान पसरून उत्तम व्यवस्था केली होती, जेणेकरून पाठीला कमीत कमी गारठा लागेल. इतकी व्यवस्था पाहून आम्हाला तर वाटले, वाह! आपल्यासाठी स्वर्गच अवतरला आहे.

काही हजार भाऊ-बहिणी शांतिवनच्या त्या निर्मितीच्या काळात तिथे उपस्थित होते. पण प्रत्येकाबद्दल तितकी आस्था बाळगून काळजी घेणाऱ्या दादीजींची कृती अलौकिक होती. इतका मोठा कार्यभार सांभाळताना इतक्या छोट्या बाबींतही लक्ष देणे म्हणजे कमाल होती. यालाच आपण 'समावेशक' वृत्ती म्हणू शकतो. 'सर्वच आपले आहेत. आपण सगळे शिवपित्याची मुले आहोत ही भावना सखोल होती, केवळ शाब्दिक नव्हती. ईश्वराला आपण सर्व गुण शक्तींचा सागर म्हणतो. सागराचे एक वैशिष्ट्य म्हणजे सामावून घेणे. दादीजी म्हणजे प्रति सागरच होत्या. हेच ते Inclusion अनेक प्रसंगातून प्रस्फुटित होई.

शांतिवनच्या सुरुवातीच्या काळातलाच अजून एक प्रसंग आहे. तिथली काही तरुण समर्पित भाऊ मंडळी सहजच फिरायला म्हणून मागील डोंगररांगेत गेली. तरुणाईच्या उत्साहाचा एक परिणाम म्हणा किंवा नशीब म्हणा; पण ती सर्व मंडळी रस्ता चुकली. तो काळ मोबाईलचा नव्हता. सकाळी बाहेर पडलेली लोकं रात्री बाराच्या पुढे संकुलात परतली. दाराशी पोहोचताच तर दादीजी अंगणात येरझाऱ्या घालताना दिसल्या. प्रथम त्यांनी चौकशी केली काय घडले याची. नंतर सूचना केली सर्वांनी ताजेतवाने व्हा आणि जेवून घ्या, उद्या सकाळी बोलू. सर्वांची मान लज्जेने खाली गेली होती. रात्र गपचूप पार पडली. सकाळी दादीजींनी साध्याच पण निश्चयी सुरात सांगितले, 'तुम्ही असे प्रकार करण्यापेक्षा कायमस्वरूपी घरीच गेलेले बरे ! तुम्हा तरुण मंडळींच्या घरच्यांनी तुम्हाला इथे रहायची परवानगी दिली आहे. मात्र तुमचे काही बरे वाईट झाले तर ती लोकं मलाच जबाबदार धरतील ना ! समोर उभ्या असणाऱ्यांच्या काळजाचे पाणी पाणी झाले. सर्वांनी मनापासून दादींकडे क्षमा मागितली आणि दादीजींनी उदार मनाने माफ केले. तिथून पुढे कुणाकडून अशी चूक घडली नाही हा आहे नियंत्रणाचा गुण. दोन प्रकारच्या नियंत्रणाचे प्रदर्शन त्यांच्या कृतीतून घडले. स्वतःच्या मन-बुद्धीवर नियंत्रण आणि नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून इतरांवरही प्रेमळ नियंत्रण. त्यात धाक होता; पण प्रेमाचा. तिथे दडपशाही नव्हती, अधिकाराचा दुरुपयोग नव्हता.

आपण शिवपित्याची लेकरे आहोत. आपले आध्यात्मिक कर्तव्य इतरांना प्रेम, शांती, शक्ती देणे हेच आहे याचा दादीजींना कधीही विसर पडत नसे. एकदा दादीजी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने कुठल्याशा शहरात गेल्या. रेल्वेने प्रवास करून ठरलेल्या स्टेशनवर उतरल्या. त्यांना घेऊन जाण्यास आलेल्या दोन-तीन भाऊ बहिणींसोबत त्या जाणार होत्या. त्यांच्याकडे काही जड सामान होतं. त्यामुळे हमाल करावा लागला. सोबतच्या भाऊ मंडळींचा हमालाशी पैशावरून वाद होणार हे पाहताच दादीजी मधे पडल्या. त्यांना हमालाला पैसे देऊन मोकळा केला. नंतर सेवाकेंद्रावर आल्यावर त्या म्हणाल्या, "आपण सगळे रोजच ईश्वरी ज्ञान ऐकतो, धारण करण्याचा आपापल्या परीने प्रयत्न करतो. मातेश्वरी जगदंबा नेहमी 'म्हणत, आपण सृष्टीरूपी रंगमंचावरचे ज्येष्ठ अभिनेते आहोत. जगाचे आपल्याकडे लक्ष आहे याच भान हवं, आपण हे सगळं विसरता कामा नये. आपलं विपरीत वागणं, आपल्या शिक्षणाचा अनादर करणारं ठरतं. तसं न होऊ देणं हेच आपलं कर्म आहे. तीच यज्ञ सेवा आहे." उपस्थित असणाऱ्या सर्वांनाच ती छोटीशी कृती खूप काही शिकवून गेली.

ज्येष्ठ राजयोग शिक्षिका उषादीदी अनुभव सांगतात. दादीजी, प्रमुख प्रशासिका असल्यामुळे अनेक छोट्या-मोठ्या लोकांशी त्यांचा संबंध येई. राजकारणी, वैज्ञानिक, समाजसेवक आणि इतर अनेक. प्रत्येकालाच त्यांच्याकडून काही ना काही मिळाले. कुणाला प्रेम, कुणाला शिकवण, कुणाला प्रेरणा... एक असेच खोडसाळ वृत्तीचे राजकारणी दादीजींना भेटले. संपूर्ण आश्रम पाहिला, ज्ञान ऐकून घेतले

(पृष्ठ क्र.१० वर)

# ...और बलिहार होकर जाए !

**ब्र.कु. दिलीप, आबू रोड**



जुलै महिना जवळ आला की 'बडी दीदी' (मनमोहिनी दीदी) च्या आठवणी ताज्या होतात. वेगवेगळ्या वर्षी पण लागोपाठच्या महिन्यात एक घटनाक्रम दिसून येतो. जून महिन्यात मम्मा, जुलैमध्ये बडी दीदी व ऑगस्टमधे कुमारका दादींनी (प्रकाशमणी दादी) देहत्याग केले व या तिघीजणींनी अनुक्रमे यज्ञकारभारातील प्रशासनामध्ये सिंहाचा वाटा उचलला होता हा एक आगळा वेगळा योगायोगच म्हणावा लागेल.

बडी दीदींची एकाग्रता ही केवळ स्वत:च्या मनापुरतीच मर्यादी नसून आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीचं मन शांत करण्याची अद्भुत शक्ती त्यांना प्राप्त झाली होती. या सबंधीची २ उदाहरणं आपण आज पाहणार आहोत.

१) मुलुंड सेवाकेंद्राच्या कार्यक्रमानिमित्त बडी दीदी मुंबईत आल्या होत्या. या कार्यक्रमामधे आमच्या परिचयातील एका व्यक्तीला आम्ही घेऊन गेलो होतो. या व्यक्तीने भक्तिमार्गातील अनेक साधना जप इ. केले होते; पण त्यांना अनुभूती /साक्षात्कार. झाला नव्हता व तो व्हावा अशी इच्छा मात्र प्रबळ होती. अशा व्यक्तींची मनोकामना 'बडी दीदीच' पूर्ण करू शकतील याबद्दल आम्हाला खात्री होती व त्याप्रमाणे आम्ही बडी दीदींना विनंती केली. त्यावर दीदींनी तात्काळ होकार दिला. ''कोई हर्जा नहीं उनको मिलवाओ।'' ती व्यक्ती समोर आल्यावर बसवून दीदींनी काही सेकंद आत्मिक दृष्टी दिली व ती व्यक्ती अशरीरी झाली. मी देह नसून आत्मा आहे व या देहात भृकुटीमधे स्थित आहे याची अनुभूती झाली व सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे काही सेकंदापुरतेच न राहता पुढे ३-४ दिवस मी आत्मा शांतस्वरूप आहे ही सुखद अनुभूती घेत होती.

यात अजून एक उल्लेखनीय गोष्ट नमूद करावीशी वाटते, वर्गात एखादा हुशार विद्यार्थी शिक्षकांनी अभ्यासक्रम शिकवण्याच्या आधीच त्यावर प्रावीण्य मिळवतो तसं दीदींच होतं. अव्यक्त वाण्यांचा अभ्यास केल्यावर लक्षात येतं की दीदींनी एकाग्रतेच्या शक्तीचे प्रयोग आधीच करून दाखवले व नंतर बापदादांनी अव्यक्त वाणीत उल्लेख केला आहे.

२) गावदेवी सेवाकेंद्रावर दीदी आल्या असताना काही पत्रकार सेवाकेंद्रावर आले होते (हे आपण ४०-४५ वर्षांपूर्वीच्या काळाबद्दल बोलत आहोत, त्यावेळेस प्रसारमाध्यमांद्वारे संस्थेचा प्रचार सर्वदूर झाला नव्हता) माध्यमांना खुसखुशीत बातम्या पुरवणे हा जणू पत्रकारांचा धर्मच असावा. अनेक प्रश्न विचारून समोरच्याला भंडावून सोडणे व त्यातून ती व्यक्ती गोंधळून जाईल. स्वत:च्या मनावरचा ताबा हरवून बसेल या इराद्याने पत्रकार आले होते.

''आम्हाला काही प्रश्न विचारायचे आहेत. संस्थेबद्दल माहिती हवी आहे'', असे सांगितलं. '३ मि. परमेश्वराच्या आठवणींत बसू व नंतर चर्चा करू' असं दीदींनी सांगितलं व सर्व पत्रकारांना केवळ १-२ मि. आत्मिक दृष्टि दिली व अपेक्षेप्रमाणेच सर्व पत्रकार आत्मानुभूतीमधे मग्न झाले. इतके एकाग्र व स्थिर झाले, ३ मि. झाली आहेत याचे भान देखील त्यांना नव्हते. त्यानंतर त्यांना विचारले, ''हं, आता बोला काय प्रश्न विचारायचे आहेत?'' पत्रकार म्हणाले, ''आम्हाला कुठलेही प्रश्न विचारायचे नाहीत व त्यांनी कबुली दिली की आम्ही तुमची परीक्षा घेण्यासाठीच आलो होतो. आम्हाला जे अनपेक्षित होतं ते मिळालं आहे. या असीम शांतीची अनुभूती घेऊन आम्ही जात आहोत.

**बच्चे, कोई सामना करते आये लेकिन बलिहार होकर जाये** हे अव्यक्त वाणीतील शब्द बडी दीदींनी सिद्ध करून दाखवले.

(पृष्ठ क्र.१४ वर)



# दृष्टी पलीकडची सृष्टी

(भाग – १)

ब्र.कु. प्रफुल्ल, मीरा सोसायटी, पुणे

मी गेली १९ वर्षे ज्ञानमार्गात असून अव्यक्त बाबांना पहिल्यांदा २००२ साली भेटलो आणि बाबांचा पुत्र बनलो. तेव्हापासून किती अनुभव झाले, सांगता नाही येणार.

एकदा बदलीच्या निमित्ताने आम्ही घर बदलून पुण्यात मीरा सोसायटीजवळ नवीन घर घेतले. त्यावेळी कुणीतरी सांगितले की तुम्ही इथे जवळच होणाऱ्या सत्संगास जाऊन प्रवचन ऐकू शकता.

मी लहानपणापासून खूप भक्ती केलीय. माझ्या आईसोबत मी कथा–कीर्तनाला जाऊन रामायण महाभारतातल्या गोष्टी ऐकायचो. तसाच हाही सत्संग असेल, असे वाटले. मी त्यावेळी फक्त १६ वर्षांचा असेन, ११वीत शिकत होतो. मीरा सोसायटी सेंटर खूप जुने असून ह्या जागेचे वैशिष्ट्य म्हणजे साक्षात् जानकी दादींनीच हे सेंटर चालू केले. हेच पुण्यातील अगदी पहिले सेंटर. दादींनी इथे पुण्यात १६ वर्षे ईश्वरी सेवा केली, १९५८ ते १९७४ दरम्यान. १९५० ला बाबा जेव्हा मुलांना घेऊन भारतात मा. आबूला आले, तेव्हा त्यांनी सर्व दादींना भारताच्या वेगवेगळ्या भागात पाठवले. त्या काळी पुण्यात सिंधी भाषक जास्त होते, त्यामुळे मातेश्वरी पुण्यास आल्या.

आपल्या मोठ्या दादी, बृज इन्द्रा, बृजशांता, ह्या सर्वांचे वाडवडील – फाळणीनंतर पुण्यातच स्थायिक झाले. पुण्यात सेवा व्हावी ह्या इच्छेखातर बाबांनी मम्मांना पुण्यात धाडले. मम्मांनी पुण्यात अनेकांना तयार केलं. पुण्यातील सेवेनंतर बाबांनी मम्मांना बंगलुरूला पाठवले आणि जानकी दादींना पुण्याला पाठवले. सुरुवातीस खूप वेळा सेंटर बदलायची वेळ आली. कधी कुठे तर कधी कुठे भाड्याने असे करत शेवटी मीरा सोसायटी हे स्थान यज्ञाच्या नावाने केले गेले. इथूनच दादी जानकींनी सुंदरी दीदींवर पुण्याचा सर्व कारभार सोपवत १९७४ साली लंडनला प्रयाण केले. आपण हा सर्व यज्ञ इतिहास जाणतोच. आम्ही अशा ह्या ऐतिहासिक सेवाकेंद्राशी निगडीत असल्याने स्वत:ला भाग्यवान समजतो. मी जरी ह्या सेंटरला २००२ साली आलो, इथले जुने विद्यार्थी दादींच्या संगोपनाच्या खूप आठवणी सांगतात, त्यावेळी सकारात्मक तरंगांचा अनुभव होतो.

मधुबनहून समर्पित आणि विदेशी भाऊ–बहिणी इथे येत असतात. सकाळी ७ वाजता तयार होऊन मी माझा धाकटा भाऊ आणि आई–बाबा सेंटरला पोचलो तेव्हा वातावरण खूप अलौकिक होते, मुरलीची वेळ होती. सगळे भाऊ बहिणी पांढऱ्या कपड्यात होते. समोर योग आसनावर दीदी बसल्या होत्या. मला वाटले, इकडे छान पूजा–अर्चा, कुणी साधू संन्यासी भजन कीर्तन करेल; पण मला समोरचे दृश्य बघून आश्चर्यच वाटलं. आपण एखाद्या शोक सभेला आलो की काय? सगळे शांततेत बसले होते. आम्ही मागे बसलो होतो तसे कुणी आम्हाला मार्गदर्शनही केले नाही. कळेना काय करावे ते ! आम्ही असेच बसून मुरली ऐकली. मुरलीत सारखे 'बाबा' शब्द येत होता. कोण हे बाबा? इथे तर कुणी बाबा दिसत नाही असे खूप प्रश्न येत होते. अचानक कुणाचं तरी लक्ष गेलं आमच्याकडे, कारण आम्ही रंगीत कपड्यांत बसलो होतो. त्यांनी आम्हाला वेगळ्या खोलीत नेले आणि विचारपूस करीत सांगितल की, तुम्ही इथे नवीन आहात, तर ७ दिवसांचा पाठ्यक्रम सुरू करा. आम्ही तसेच केले. मग त्यात आम्हाला खूप काही समजले. सर्व प्रश्नांची उत्तरे मिळत गेली. भक्ती आणि ज्ञानातील अंतर समजत गेले. उत्सुकता वाढत गेली.

मला वाटायचं की, ह्या सृष्टीचा अंत कसा होईल? कारण लहानपणी Cosmos, Big bang theory बद्दल बरंच काही ऐकल्याने वाटायचं ह्याची सीमारेषा कुठे असेल, कोण सर्वज्ञ आहे?

मला आठवतंय ज्ञानात यायच्या ३-४ वर्ष आधी शाळेजवळच्या मंदिरात मी आईबरोबर जायचो. ह्या मंदिराचे वैशिष्ट्य असे होते की त्या एकाच जागेत खूप छोटी मंदिरं, कुठे गणपती, तर कुठे शंकर, तर कुठे कुणी. मला वाटायचं अरे बापरे! एवढी दैवतं! ह्यात कोण मोठं आणि माझी प्रार्थना तरी कोण ऐकेल?

त्यावेळी मला ज्ञान नव्हते. मग काही कळेनासे व्हायचे. मी एकेका देवतेला एकेक प्रश्न विचारायचा. अभ्यासाची, चांगल्या बुद्धीची मागणी करायची, चांगल्या संस्काराची – आता विचार केला तर हसू येतं.

भक्तीमार्ग हा एक प्रकारे खूप रोचक; पण गोंधळात टाकणारा होता. स्पष्टता नव्हती; पण आम्ही ज्ञानात आलो तेव्हा हे सर्व स्पष्ट व्हायला लागले.

अजून एक गोष्ट स्वतःबद्दल सांगू इच्छितो. माझी त्वचा पांढऱ्या रंगाची आहे. सर्वांगावर कोड आहे. अशी त्वचा असणाऱ्या आमच्यासारख्या लोकांना 'अल्बिनो' म्हणतात ते लहानपणापासूनच असते. यामुळे आमच्यासारख्या लोकांची दृष्टी खूप कमी असते आणि सर्वसामान्यांच्या त्वचेत मेलानीन नावाच्या रंगद्रव्याने येणारा रंग (सर्वात वरचा) नसतोच. माझा जन्म झाला, तेव्हा माझ्या आई-बाबांच्या हे लक्षात आलं की, हे मूल वेगळच आहे. डॉक्टर म्हणाले की ह्या खूप दुर्मीळ केसेस असतात. ह्यात डोळ्यांच्या समस्या असतात.

आई बाबांना वाटायचं मला कितपत दिसतयं? ते पाहायला ते टॉर्चचा प्रकाश चालू करून फिरवायचे तेव्हा त्यांना कळलं की, हा थोडं फार तरी पाहू शकतो. थोडा मोठा झाल्यावर डॉक्टरी निरीक्षणात कळले की माझे डोळे ८५% अधू आहेत म्हणजे मला १०-१५% दिसतं. मी फक्त ३-४ फुटापर्यंतच पाहू शकतो. लहान वस्तू मी डोळ्याच्या खूप जवळ घेऊन बघतो.

शाळेत पहिलीच्या वर्गात गेलो. तेव्हा शिक्षकांनी बघितले की मी पुस्तक १-२ सेंमी अंतरावरून वाचतोय. सगळी बाकीची मुलंही आश्चर्याने बघायची हा असा काय करतोय? फळ्यावरचं तर मला काहीच दिसायचं नाही. त्यामुळे वर्गात काय शिकवत आहेत हे ही समजायचं नाही. जरी मी पहिल्या बाकावर बसत असलो तरी त्यामुळे मी इकडे तिकडे बघण्यात वेळ काढायचो. माझ्या पालकांना माझी खूप काळजी वाटायची की ह्याच कसं होणार?

त्यावेळी आजच्या सारख्या साधनांचा, इंटरनेट, मोबाईलचा जमाना नव्हता. ना संगणक ! तो ७०चा काळ होता. माझा अभ्यास आईच पूर्ण करायची, कुणाची तरी वही घेऊन शाळा सुटल्यावर. शिक्षकांनी पालकांना सुचवलं की तुम्ही त्याला नेहमीच्या शाळेमध्ये घालू नका. अशा लोकांच्या वेगळ्या शाळा असतात. ह्याला या शाळेत ठेवलं, तर तो पुढे नाऊमेद होईल. पण माझे पालक हरले नाहीत. ते म्हणाले आम्ही स्वतः कष्ट करून आमच्या पाल्याला शिकवू. आई अजूनही त्यावेळच्या गोष्टी सांगते. मला आठवत नसलं तरी तिच्या स्मृतीत मात्र त्या पक्क्या आहेत. माझ्या आईच्या कष्टामुळेच मी १०वी पर्यंत कसाबसा पास झालो. १० नंतर खरी परीक्षा सुरू झाली. मला सीए व्हायचं होतं. सायन्स घेऊन डॉक्टरही व्हायचे होते. पण त्यात डोळ्यांचं खूप काम असत. मग कुणीतरी सुचवलं की तू कॉमर्स घे, त्यात डोळ्यांनी एवढं बघायचं नसतं. आणि कॉमर्स घेऊन सीए व्हावं असं ठरलं. खरं तर हे खूप कठीण आहे. १००तली केवळ २% लोकच पास होतात. माझ्या काही चुलत भावांनी सांगितलं की सीए होणं खूप कठीण आहे. १०-१० वेळा परीक्षा द्यावी लागते. तुला तर काही दिसतही नाही. तू अजून निराश होशील. तू B.Com होऊन एखादा जॉब कर असे खूप समजावले.

जेव्हा मी ब्रह्माकुमारीजचा ७ दिवसांचा कोर्स केला, तेव्हा मला खूप नवनवीन गोष्टी कळल्या की राजयोग काय आहे? सृष्टिचक्र काय ? सगळ्यात महत्वाचे म्हणजे मी एक आत्मा आहे, शरीर विनाशी आहे. सृष्टीनाटकाचे ज्ञान झाले मागच्या जन्मीचे सगळे कर्म हिशोब ह्या जन्मी पूर्ण होतात. हा आपला शेवटचा जन्म आहे. ह्या गोष्टी कळल्याने ज्ञानात रस वाटायला लागला. मी स्वतःसाठी स्वमानाचा अभ्यास करायला लागलो. त्यात टिकणेही सहज झाले आणि हळूहळू माझा आत्मविश्वास वाढायला लागला.

शाळेत लहान असताना (५-६ वर्ष) मुलं मला खूप चिडवायची. माझे वेगळे दिसणे आणि मला समोरचे काहीच न दिसणे त्यामुळे मुले मला दगडं मारून पळून जायची. मला कळायचं नाही की दगड नेमका कोणत्या दिशेने येतोय. मी मान वळवेपर्यंत मुलं पळायची. त्यांना माहीत होत मी त्यांना पकडू शकणार नाही. ह्याच दगडांनी माझे किती चष्मे तुटले असतील ! बाकीचा अनुभव पुढील भागात पाहू.

(क्रमशः)

***



# शिवसंदेश वाहक 'वीर हनुमान' : दादा आनंदकिशोरजी!

ब्र.कु. हेमंत, शांतिवन

दुष्ट रावणाने छळ करून माता सीतेचं अपहरण केलं अन् अशोक वाटिकेत नेऊन ठेवलं, तेव्हा पवनपुत्र हनुमानाने विशाल सागर लांघून माता सीतेस श्रीरामांचा संदेश पोहोचवला. असंच घोर कलियुगात आत्मारूपी सीता विकाररूपी रावणाच्या तुरुंगात कैद झाल्या, तेव्हा काम, क्रोधादी मनोविकारांच्या बंधनातून आत्म्यांना स्वतंत्र करण्यासाठी स्वयं निराकार शिव(राम) धरतीवर अवतरले. शिवआज्ञा सिरसावंद्य मानून, बजरंगबली प्रमाणे सात समुद्र पार करून परमात्म्यांपासून विन्मुख झालेल्या आत्मारूपी सीतांना ईश्वरी संदेश दिला. अशा खऱ्या शिवसंदेश वाहक 'वीर हनुमान' दादा आनंदकिशोरजींचे ईश्वरी सेवेच्या स्वर्णिम इतिहासात अविस्मरणीय स्थान आहे. दादांनी देश–धर्म–रंग–भाषेच्या भिंती ओलांडून परदेशात शिवध्वज फडकवला आणि ज्ञान संजीवनीद्वारे काम, क्रोधादी विकारांनी मूर्छित झालेल्या मानवी मनात प्राण फुंकले. जना–जनास प्रभू संदेश देणारे दादा आनंदकिशोर पांडवांमध्ये अग्रणी अलौकिक ईश्वरी दूत ठरले. त्यांनी देश–विदेशात ईश्वरी सेवेसाठी निरंतर यात्रा केल्या, ज्ञानाचा शंखध्वनी करून अनेक ठिकाणी राजयोग सेवाकेंद्रे स्थापन केली व शिवबाबांना विश्वकल्याणकारी जगत्पित्याच्या रूपात प्रसिद्ध केलं.

सिंध हैद्राबाद मधे दादांचा जन्म झाला तेव्हा मातपित्याने नाव दिलं 'लक्ष्मण.' बालसुलभ सहज सरल आनंददायी संस्कारामुळे शिवपित्याने अलौकिक नाव दिलं 'आनंदकिशोर.' दादा लौकिक नात्याने दादा लेखराजांच्या मोठ्या भावाचे जावई, मनमोहिनी दीदींचे लौकिकमधे दीर व प्रकाशमणी दीदींचे लौकिक संबंधात चुलत भाऊ होते. दादा लेखराजांसारखाच आनंद किशोर दादांचाही कोलकाता येथे हिरे जवाहिऱ्याचा सफल व्यवसाय होता. कोलकात्याच्या 'न्यू मार्केट'नावाने प्रसिध्द असलेल्या 'चार्ल्स हॉग मार्केट'च्या समोर सात मजली इमारतीत पहिल्या मजल्यावर दादा लेखराज यांचे ७ए, लिण्डसे स्ट्रीट, सुराना मेन्शन, न्यू मार्केट ह्या पत्यावर जवाहिऱ्याचे दुकान होतं. त्याच्या जवळच ग्लोब सिनेमा हॉल होता, तिथे एक घर सोडून दादा आनंदकिशोर व त्यांचे भागीदार 'राम' या दोघांचं 'रामलक्ष्मण एण्ड कंपनी' ह्या नावाने हिरे जवाहिराचे दुकान होतं. जेव्हा सिंध हैद्राबाद येथे ओममण्डळीची स्थापना झाली, तेव्हा उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना घेऊन दादा आनंदकिशोर कोलकात्याहून सिंध हैद्राबादला गेले. परमात्म्याच्या परकाया प्रवेशानंतर भागीदार सेवकराम यांना हिऱ्याचा धंदा सोपवून दादा लेखराज शिवपित्यावर अर्पित झाले व 'प्रजापिता ब्रह्मा' संबोधले गेले. तसंच ब्रह्माबाबांच्या पावलावर पाऊल ठेवत आनंदकिशोर दादांनीही पार्टनर 'राम' यांस हिऱ्याचा व्यवसाय सोपवला व रुद्र ज्ञान यज्ञात स्वाहा झाले. विषय–वासना व विकारांत फसलेल्या मानवास मुक्त करण्यात परमात्म्याचे सहायक बनण्याचे मनांत लक्ष्य पक्के करून ईश्वरी मार्गावर अग्रेसर झाले.'यथा नाव तथा गुणे' ह्या म्हणीप्रमाणे शिव'रामाचे' खरे सांगाती 'लक्ष्मण' बनले.

ओममण्डळीत त्यावेळी एकूण ३०० माता–भगिनी व ७५ भाऊ होते. त्याकाळी ब्रह्माबाबा शिकवण देत, 'सदैव मातांना पुढे करा.' बाबांच्या ह्या आदेशास त्यांनी आशीर्वादच मानला. यज्ञारंभी समर्पित बांधवामध्ये ते सर्वात जास्त शिकले–सवरलेले होते. इंग्रज राजवटीतले ग्रॅज्युएट असूनही, लौकिक शिक्षणाचा गर्व न बाळगता, माता–भगिनींना सन्मान देऊन पुढे ठेवण्याचा सिद्धांत बनवला. मातृशक्तीस गाईडच्या (मार्गदर्शक) रूपात स्वीकार करून स्वतःस मात्र गार्ड (रक्षक) मानून, त्यांच्या रक्षणाचे दायित्व

स्वीकारले. सदैव शिवशक्तींचे विनम्र सेवक, सच्चे पांडव बनून प्रगती करत राहिले. दादांनी १९२५ मध्ये कोलकाता विश्वविद्यालयातून पदवी शिक्षण पूर्ण केलं. दादा बी.ए. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. हे त्या काळात विशेष यश होते. दादांची इंग्रजी भाषेवर कमालीची पकड व प्रभुत्व होतं. ते ज्ञानमुरलीचं इंग्रजीत भाषांतर करण्यात तरबेज होते व जनतेला आध्यात्मिक ज्ञान सहज समजू शकेल, अशा सरल हिंदी व इंग्रजी भाषेत लेख लिहिण्यात निपुण होते. दादा ईश्वरी साहित्याचे संपादन करत, पुस्तकं बनवत आणि ब्रह्माबाबांच्या आज्ञेप्रमाणे मंत्र्यांना देऊन सेवा करत. विशेष म्हणजे देश-विदेशात इंग्रजीत प्रभावशाली पत्र-व्यवहार करण्याचं जणु काही त्यांना शिवपित्याने वरदान दिलं होतं. यज्ञाच्या आरंभी दादा ऑफिसचे कार्य सांभाळण्यास निमित्त बनले आणि अखेरच्या श्वासापर्यंत ते निष्ठापूर्वक सांभाळलं.

भारताचे विभाजन झाल्यानंतर ओममण्डळी आबूला स्थानांतरीत झाली. तेव्हा आबूच्या विषम वातावरणात ब्रह्मावत्स आजारी पडू लागले. त्याकाळी दादा, बाबांच्या आदेशानुसार अहमदाबाद येथे राहून, डॉक्टरांशी संपर्क साधत व अस्वस्थ भाऊ-बहिणींवर उपचार करत. बाबा म्हणत, 'वत्सांनो ह्या परमात्म ज्ञानाने श्रेष्ठ पद प्राप्त होतं, त्यामुळे अडथळे -संकटे येतील, परंतु तुम्ही चिंता करू नका.' खरोखरच भारतात आल्यावर ज्यांनी ओममंडळीस अर्थ-सहाय्य करायचं कबूल केलं होतं, ते दिलेल्या वचनास जागले नाही. त्यावेळी यज्ञात आर्थिक चणचण असूनही ब्रह्मावत्स अविचल राहिले. त्यानंतर दादांना लौकिक आप्तेष्टाचे निमंत्रण प्राप्त झाल्यावर दादा आनंदकिशोर, मनमोहिनी दीदी, गंगे दादी व संतरी दादींना बाबांनी सेवार्थ भारतभ्रमणास पाठवले. तेव्हा साधु-संत व महात्म्यांना संपर्कात आणण्यासाठी ऋषीकेश व हरिद्वारला गेले. तिथे स्वामी शिवानंदांच्या आश्रमात आयोजित कॉन्फ्रन्समध्ये गंगे दादींनी सुंदर प्रवचन केलं. प्रवचन ऐकणाऱ्या श्रोत्यांमध्ये एक भाऊ नुकत्याच झालेल्या प्रथम धार्मिक संमेलनात भाग घेऊन परतलेला होता. त्याने जपान येथे होणाऱ्या द्वितीय धर्म संमेलनाच्या आयोजकांना पत्र लिहिलं, 'ब्रह्माकुमारी संस्था खूप छान आहे. त्यांना आगामी द्वितीय धर्म संमेलनात अवश्य निमंत्रण देऊन बोलवा.' म्हणून त्यांच्या बोलावण्यानुसार ब्रह्माबाबांनी दादी प्रकाशमणी व दादी रतनमोहिनी यांच्या सोबत दादांना जपानला पाठवलं. नावीन्यपूर्ण ईश्वरी ज्ञानाच्या प्रभावाने अनेक संस्था दादांना सेवेच्या संधी देऊ लागल्या. जपानमध्ये भेटलेल्या मूळ भारतीय रहिवासी सिंधी, गुजराती, पंजाबी बांधवांचे तर आश्चर्याने डोळेच उघडले. भारतच्या फाळणीनंतर मुस्लिम राजवटीत तीन वर्ष ब्रह्मावत्स सुरक्षित राहिले तरी कसे! त्यांचा असा समज झाला होता ब्रह्माकुमारी संस्था कदाचित कायमची बंद पडली असावी. गुजराती-पंजाबी बंधुंनी दादा व दादींचा मोठा सत्कार करून सहकार्य केले.

दादा आनंदकिशोर व दोन्ही दादींनी जपानमध्ये सहा महिने मनःपूर्वक सेवा करून परदेशात ईश्वरी सेवेचा श्रीगणेश केला. परतीच्या प्रवासात दादांना सिंगापूरहून मित्र मंडळींनी सेवेचं सहर्ष निमंत्रण दिलं, तेव्हा हाँगकाँगला दोन महिने राहून स्वजन व आप्तेष्टांची खूप सेवा केली. त्यानंतर जलमार्गाने मद्रास (चेन्नई) येथे आले. दादांची अथक सेवा पाहून बाबा निरतिशय खुश झाले आणि दादी जानकी व जगदीश भाईंना त्यांचे स्वागत करण्यासाठी चेन्नईला पाठवलं, त्याद्वारे मीडिया व सिंधी समाजाची खूप सेवा झाली. बाबांनी त्या सर्वांना सरळ आबूला न बोलवता, चित्रकूट येथे ऑक्टोबर महिन्यातील पौर्णिमेला भरणाऱ्या मेळ्यात पाठवले. तेथील अज्ञानाच्या निद्रेत झोपी गेलेल्या आत्म्यांना जागवून दादा मुंबई, लखनऊ, कानपुर व दिल्लीत सेवा करून आबूला आले. तोपर्यंत आश्रमाचे स्थान बृजकोठी येथून स्थलांतरित झाले. नंतर कोटा हाऊस व धौलपूर हाऊस मिळालं. तिथे दादा व दादी बाबांना भेटले. बाबांनी त्यांचे जोरदार स्वागत व सत्कार केला. जपान येथे झालेल्या सेवांमुळे देश-विदेशामध्ये ब्रह्माकुमारी संस्थेचे नाव मोठं झालं होतं. फलस्वरुप भारतातही ईश्वरी सेवेचा तीव्रतेने विस्तार झाला. त्यानंतर दादा अनेक ठिकाणी जात राहिले. दादांनी इलाहाबादला (प्रयागराज) कुंभमेळ्यात ज्ञानाचा शंखनाद करून परमात्म संदेश दिला. त्यानंतर कानपुरच्या एका श्रीमंत व्यापाऱ्याने निमंत्रण देऊन त्याच्या घरातच सेवाकेंद्र उघडले. ह्याच ओघात अहमदाबादलादेखील सेवाकेंद्र उघडले. सन् १९५५ साली भारतातील पहिले म्युझियम (संग्रहालय) जयपूर किशनपोल येथे बनले तेव्हा बाबांनी दादांना तिथे पाठवलं. जिथे-जिथे

नवीन सेवेचा शुभारंभ होई, तेथील धरणी तयार करून आध्यात्मिक ज्ञानाचे बीज पेरण्यासाठी बाबा, दादांनाच सर्वात आधी पाठवत.

राजयोगी भ्राता निर्वैरजी दादांच्या सोबतचे अनुभव अशा प्रकारे सांगतात, 'दादा आनंदकिशोर मला ईश्वरी सेवेची मेख शिकवणारे माझे रोल मॉडेल होते. ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यावर मला व दादांना मधुबन येथे राहण्यासाठी निमंत्रण मिळाले, तेव्हा एकाच ऑफिसमध्ये एकत्र राहून, दादांचा सेवासाथी बनून कार्य करायचे सौभाग्य लाभलं. वार्तालाप करत, सेवेची योजना बनवत. मला इंग्रजीचा सराव व्हावा म्हणून मोठ्या आवाजात इंग्रजी वर्तमानपत्र वाचायला सांगत. संवाद साधायचे व पत्र लिहायचे प्रशिक्षण देत. मला नेहमीच प्रत्येक कार्यात मार्गदर्शन करत. छोट्याशा टाईपराईटरने व्ही.आय.पींना निमंत्रण पत्र टाईप करून जिथे पाठवत, तिथे मी जाई. दादांचे पत्र लिहिण्याचे कौशल्य अफलातून होते. लेटरच्या तीन चतुर्थांश भागात – ब्रह्माकुमारी संस्था नेमकी काय आहे? तेथे माता–बहिणी काय सेवा करतात? इत्यादी विस्तारानं लिहीत. नंतर आवश्यक कार्याचे वर्णन करत. त्यामुळे ऑफिसर्स व मंत्री मनमोकळेपणे सहकार्य करत. इसवी सन् १९७२ मध्ये अमेरिकेहून योग संस्थेद्वारे निमंत्रण मिळालं, तेव्हा सेवेचा आराखडा बनवून शीलेंद्रा दादी, जगदीश भाई, रमेश भाई–उषा बहन, रोझी बहन व डॉक्टर निर्मला दीदी विदेशात गेले. हे सर्व महारथी आधी लंडनला गेले, तिथे विदेशातलं पहिलं सेवाकेंद्र उघडलं व परकीय भूमीवर सेवेची पाळमुळं रुजवली, याचं सर्व श्रेय दादांनादेखील जातं.

आनंदकिशोर ह्या नावाप्रमाणेच प्रत्येक कर्माला आनंद देणारी क्रीडा बनवणारे दादा स्वभावाने फारच रमणीक होते. एकदा निर्मलशांता दादींच्या लौकिक मुलीने कुवैतहून फ्रिज पाठवला. दादींनी आईस्क्रीम बनवून खाऊ घातले व विचारलं, 'सर्वांनी शिवबाबांच्या आठवणीत प्रेमाने आईस्क्रीम खाल्ले ना?' त्यावर दादांनी काहीच उत्तर न देता ब्रह्माबाबांना पत्र लिहिलं, 'बाबा, निर्मलशांता दादींनी इतके छान आईस्क्रीम खाऊ घातले की खायच्या भरात शिवबाबांची आठवण करायला विसरलो. दादींना दुसऱ्यांदा आईस्क्रीम खाऊ घालायला सांगा, जेणेकरून शिवबाबांच्या आठवणीत पुन्हा खाऊ.' दादा खूप मिश्किल होते, नेहमीच हलक्या–फुलक्या स्थितीत हसत–खेळत असत. दादांना सेवेची अंतःकरणापासून तळमळ होती. ते नव–नवीन सेवा–योजना बनवत, विविध पत्रके छापत व जनतेस परमात्म परिचय देण्यासाठी मोठ्या धडाडीने झटत. एकदा गंमतीची गोष्ट घडली. दादा जयपूरमधे होते, त्यांनी 'ईश्वरी निमंत्रण' ह्या नावाने एक पत्रक छापलं, एका व्यक्तीने 'ईश्वरी निमंत्रण' याचा अर्थ देवाघरचं बोलवणं (म्हणजे मरणे) असं समजून म्हणाला, 'आम्हाला नको ते ईश्वराचं निमंत्रण' तेव्हा दादांना म्हणालो की हेच निमंत्रण वेगळ्या प्रकारे लिहा, तेव्हा दादांनी लिहिलं 'डिवाईन इन्वीटेशन (दिव्य निमंत्रण)!' दादांच्या पेहरावाकडे पाहून ते चारित्र्यवान आहेत असे जाणवत असे. खरे तर दादा ब्रह्माबाबांच्या भावाचे जावई होते, परंतु ते सदैव बाबांचे आज्ञाधारक पुत्र बनून राहिले. दादांच्या सोबत मी सायंकाळी म्युझियम मधे सेवेसाठी जाई व नक्की लेक वर फिरत–फिरत गप्पा–गोष्टी करत परत येई, दादांच्या सोबत रमत–गमत घालवलेला एक न् एक दिवस अतींद्रिय सुख देणारा होता.'

मज् आत्म्यालाही दादांच्या स्नेह सानिध्याच्या स्वर्णिम संध्या लाभल्या. दादा फिरत–फिरत मातेश्वरी भवन येथे येत, तेव्हा माझं वय लहान होतं. तरीही दादा मनमोकळेपणे मित्र बनून गप्पागोष्टी मारत. एके दिवशी हातात हात घेऊन मला म्हणाले, 'बघ हेमंत, कुणी कसाही असो, त्याला इतकं प्रेम द्यायला हवं, इतका मनःपूर्वक सन्मान देऊन हितगुज करायलं हवं, जेणे करून तो कायमचा आपला झाला पाहिजे. प्रेमात शत्रूलाही मित्र बनवायची अफाट शक्ती आहे.' दादांची ही शिकवण मला पदोपदी कामी आली. दादांची आनंदी वृत्ती व प्रसन्नतेने प्रफुल्लित हर्षितमुखी चेहरा विसरता विसरत नाही.

दिवंगत राजयोगी भ्राता रमेश शहा यांनी दादांची वैशिष्ट्ये अशा प्रकारे वर्णन केली आहेत, 'विराट प्रतिभेचे मानकरी असणाऱ्या दादांशी माझा सन् १९५७ मधे परिचय झाला. माझ्या लौकिक आईची, ब्रह्माबाबांना व मातेश्वरी सरस्वतींना मुंबईला बोलवायची खूप इच्छा होती, परंतु आईचे निमंत्रण स्वीकार न करता बाबा म्हणाले, 'जर रमेशने निमंत्रण दिलं तर जरूर येईन.' माझ्या मनात विचार आला की इतक्या महान विभूतीस निमंत्रण पत्रही छान दिलं पाहिजे. अलौकिक शैलीत पत्र लिहिणं मला जमलं नाही, तेव्हा

पुष्पशांता दादींनी आनंदकिशोर दादांशी माझी भेट करविली व त्यांना निमंत्रण पत्र लिहायला सांगितलं. दादांनी बाबा-मम्मांच्या प्रतिभेस अनुरुप एवढं सुंदर निमंत्रणपत्र लिहिलं की ते हाती पडताच प्रसन्न होऊन बाबांनी टेलिग्राम (तार) द्वारे यायची स्वीकृती दिली. बाबा चार महिने मुंबईत राहिले, त्याचं श्रेय मी दादांना दिलं, मनापासून दादांचे आभार मानले व त्यांच्यासोबत माझे संबंध घनिष्ट होत गेले. सन १९६८ मधे ब्रह्माबाबांनी मला व प्रकाशमणी दादींना ट्रस्ट बनविण्याकरता मधुबनला बोलावलं, तेव्हाही दादाच ट्रस्ट बनवण्यात सहयोगी बनले. दादा आनंदकिशोरजींचा मनमोकळा, निश्चिंत, बादशहाचा स्वभाव व आनंददायी शैली विसरणे शक्य नाही.

अंतिम समयी दादा ग्लोबल हॉस्पिटलमध्ये दाखल झाले होते, आजारी असूनही श्रेष्ठ स्थितीत स्थित होऊन सर्वांना प्रेरणा देत होते. कुणी त्यांच्या तब्येतीविषयी विचारपूस केली तर म्हणत, 'आय एम ओ.के. किंवा आय एम बेटर दॅन यू (मी छान आहे किंवा तुमच्या पेक्षाही ठीक आहे.) चेहऱ्यावर मंद-मंद हास्य प्रकट करून, इतरांना दादा स्वतःची तब्येत बरी नसल्याची जाणीवही होऊ देत नसत. डॉक्टर चेकिंगसाठी आले तर स्वतःहून विचारत, 'डॉक्टर, हॉऊ आर यू (आपण कसे आहात) तेव्हा त्यांनाही आश्चर्य वाटे. वयाच्या ८९ वर्षी चिर-तारुण्य अनुभवत दादा म्हणत, 'आय एम वेरी यंग (मी अजून तरुण आहे)' सर्व त्यांच्या आरोग्याविषयी चिंता करत, मात्र ते इस्पितळातही हसत-हसत सर्वांचे स्वागत करत व म्हणत, 'मी तर इथे एकांतात बाबांची आठवण करण्यासाठी आलोय.' असे महावीर हनुमानासारखा संपूर्ण निश्चयबुद्धी बनून, बाबांचे इशारे जाणून, प्रत्येक आदेशाचे पालन करणारे, विश्वकल्याणकारी शिवसेवक, विश्वसेवाधारी आदी रत्न दादा आनंदकिशोर बुधवार दिनांक २ सप्टेंबर १९९८ रोजी दिलाराम शिवबाबांशी संवाद साधत-साधत, रात्री ८.३० वाजता देहाच्या पिंजऱ्यातून मुक्त झाले. अशा परमात्म संदेशवाहक महावीर 'हनुमान' दादा आनंदकिशोर यांना आमुचे शत् शत् नमन !

***

---

(पृष्ठ क्र.३ वरुन)

आणि दादीजींसोबत बसल्यावर त्यांनी प्रश्न केला, 'एवढ्या मोठ्या कारभारासाठी लागणारा पैसा कुठून येतो? तुम्हाला परदेशातून अर्थ सहाय्य मिळतं का?' त्यावर दादीजींनी दिलेले उत्तर अप्रतिम होते. त्या म्हणाल्या, ''आमचे धन कोठून येते ते मी सांगते; पण तुमचे धन कुठे व्यर्थ जाते यावर तुम्ही कधी विचार केलाय का?'' हे ऐकून ती व्यक्ती सर्दच झाली.

राजकारण्यांसमोर मिंधे होणारे लोक त्यांनी पाहिले होते; पण आध्यात्मिक निर्भीडपणा काय असतो त्याचा त्या सद्गृहस्थांना प्रत्यय आला. दादीजींचे चारित्र्य स्वच्छ आरश्याप्रमाणे होते, त्यात पाहणाऱ्याला स्वतःच्या दुर्गुणांचे प्रतिबिंब दिसे. साधनेच्या बळावर मनुष्य निर्भय बनत जातो. प्रांजळ असून मुजोर बनत नाही याचे उत्तम उदाहरण म्हणजे दादीजी होत्या.

डॉ. अब्दुल कलाम दादीजींना शांतिवनमध्येच भेटले. त्या दोघांतली भेट पाहणाऱ्या प्रत्येकाला वाटले, यांचे कितीतरी वर्षांपासूनचे घनिष्ट संबंध असावेत. जणू दोन मित्र किंवा जवळचे नातेवाईक भेटावेत तशी ती भेट ठरली. डॉ. कलाम साहेबांचे भारताबद्दलचे अपार प्रेम तर सर्वश्रुतच आहे. त्याच पार्श्वभूमीवर त्यांची दादीजींशी चर्चा झाली. जेव्हा कलाम साहेबांनी संस्थेच्या ज्ञानाची भूमिका ऐकली, भारत एकेकाळी इतका सुजलाम् सुफलाम् होता, सोन्याचा धूर निघत असे हे ऐकले तेव्हा त्यांनी विचारले, ''मग भारतावर इतकी आक्रमणे झाली, पण भारताने इतरांवर आक्रमणे नाही केली. भारताने अशी भूमिका का नाही बजावली? दादीजींनी फक्त एवढेच उत्तर दिले,'' भारत साऱ्या जगावर मातृवत प्रेम करतो. भारत जणू जगाची आई आहे. आई आपल्या मुलांवर आक्रमण कसे करू शकेल?'' या उत्तराने डॉ. कलाम अतिशय शांत झाले. आजवर त्यांना अशा विचारांच्या बैठकीतून कुणी उत्तर दिले नव्हते. ते विचारमग्न झाले; पण त्यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते. अशा प्रकारे दादीजी ज्यांच्या संपर्कात आल्या त्या प्रत्येकाच्या हृदयावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची छाप उमटली. दादी प्रकाशमणी म्हणजे एक प्रकाशपुंज होत्या. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते, 'धन्य ते हात ज्यास नवनिर्मितीचे डोहाळे.'

***

# कर्करोगाशी लढा

**ब्र.कु. स्मिता, ठाणे**



मी ब्र. कु. स्मिता ! गेली १० वर्ष मी प्रजापिता ब्रह्मा कुमारी संस्थेच्या ठाणे सेवा केंद्रावरील विद्यार्थिनी आहे. मला शिवबाबांच्या सहवासाचे व सहकार्याचे अनेक अनुभव आले. त्यामुळे मी स्वत:ला अत्यंत नशीबवान मुलगी समजते. पण गेल्या वर्षातील अनुभव अतिशय अनोखा आहे.

नोव्हेंबर २०२१ सर्व सुरळीत असताना अचानक माझ्या आयुष्यात एक वादळ आलं. माझ्या छातीत डाव्या बाजूला एक गाठ आढळून आली व डॉक्टरकडे जाऊन चाचणी केली. हा प्राथमिक पातळीवरील स्तनाचा कर्करोग आहे हे ऐकल्यावर भीतीने माझ्या पायाखालची जमीनच सरकली.

खूप दु:ख, चीड व हलबलतेची मिश्र भावना मनांत घर करू लागली. हे माझ्या बाबतीतच का? मीच का? असे निरनिराळे प्रश्न मनांत येत होते. आलेल्या परिस्थितीला मी स्वीकारूच शकत नव्हते व तेव्हा शिवबाबांच्या ज्ञानमुरलीतील शब्द आठवले. ''अगर कोई भी परिस्थिति आती हैं तो क्यों क्या मत करो, यह सोचकर खुश हो जाओ की हमारे हिसाब-किताब चुक्ता हो रहें हैं । लगेच मी बाबांच्या आठवणींत बसले व मला जाणवले की ह्यालाच बाबा 'अचानक का पेपर' म्हणतात. बाबांनी दिलेल्या ज्ञानाचा वापर करण्याची वेळ आता आली आहे व मी संपूर्ण ताकदीनिशी या रोगाचा सामना करण्याचा दृढनिश्चय केला व ज्ञानमंथनातून मला काही मोती मिळाले, जसे

१) आपल्या बाबतीत जे काही घडते त्याला फक्त आपण आणि आपणच जबाबदार आहोत.

२) हा सृष्टीरूपी 'ड्रामा' कल्याणकारी आहे. जे होते ते भल्यासाठीच व माझा स्वत:वर, बाबांवर आणि ड्रामावर पूर्ण निश्चय आहे.

३) आतापर्यंत आपण छोट्या गोष्टींना मोठं करण्यातच धन्यता मानत गेलो; पण ज्ञानमार्गात आल्यावर ''बडी बातों को कैसे छोटा करना'' हे शिकलो.

४) संकल्पातून सृष्टीची उत्पत्ती - जसे आपले विचार तसे भाग्य बनत जातं.

बाबांच्या या वचनांमुळे मी प्राप्त परिस्थितीला स्वीकारू शकले व माझं मन शांत झालं तसेच माझ्यातील सूक्ष्म शक्तींची जाणीव झाली.

डिसेंबर (२०२१) उजाडला. रायपुरमधे माझा एक मामेभाऊ राहतो. तो कर्करोग तज्ज्ञ आहे. त्याच्याशी मी बोलल्यानंतर त्याने त्वरीत मुंबईमधल्या डॉ. मंदार कुलकर्णींना भेटायला सांगितले. त्यांना भेटल्यावर अनेक टेस्ट केल्यावर नंतरच्या २० दिवसात शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. मी बाबांना मनोमन म्हटलं, ''बाबा तुम्हीच अविनाशी शल्यविशारद आहात व तुम्हालाच माझी शस्त्रक्रिया करायची आहे. शस्त्रक्रिया पार पडली. नंतर कीमोथेरपी व रेडीएशन सुद्धा घ्यावं लागेल असं समजलं. ते ऐकल्यावर परत मी निराश झाले कारण कीमो व रेडीएशनबद्दल अनेक मत मतांतरे ऐकली होती. पण पुन्हा एकदा बाबांच्या ज्ञानाच्या आधारे मी ते स्वीकारलं व कीमो उपचार सुरू झाले.

जानेवारी २०२२ उजाडलं. कीमोच्या प्रत्येक सेशन नंतर अशक्तपणा जाणवायचा व इतर साइड इफेक्टस् दिसत होते. त्यामुळे मन खट्टू होत असे. अचानक मनांत आलं की कुठलाही कर्करोग पीडित रुग्ण कीमो घ्यायला तयार नसतो. सर्वांकडून या औषधाला हेटाळणीच मिळते तरीही हे औषध कितीतरी लोकांना बरं करतंय! मग आपण जर चांगल्या भावनेने हे औषध स्वीकारलं तर काय चमत्कार घडवू

शकेल. जसं पाणी प्रभारीत करून पितो तसं मी कीमो औषधाला विचारांच्या माध्यमातून प्रभारीत करायला सुरुवात केली. कीमोची बाटली बघून मी तिच्याशी जणू एखाद्या व्यक्तीशी बोलावं तसं बोलायचे. ''मी तुला धन्यवाद देत आहे व तुला स्वीकारत आहे.'' या प्रयोगाने मला होणारा त्रास व साईड इफेक्टस् कमी होत गेले. तसेच माझी नित्याची कामेदेखील मी स्वत:च करू शकत होते.

कीमोचा दुसरा साईड इफेक्ट म्हणजे डोक्यावरचे केस गळू लागतात. पण मी ते स्वीकारले व मनाला समजावले की हे फक्त काही काळापुरतेच असणार आहे व ह्या विचारामुळे मला बळ आलं व केस गळण्याचं अजिबात दु:ख झालं नाही. केस गळतीला सामोरं जाण्याकरिता मी स्वत:च केशवपनाचा निर्णय केला. मी सतत बाबांच्या स्मृतीत असे, हॉस्पिटलमध्ये सुद्धा ५-६ तास योग (परमात्मस्मृती) करत असे. रेडीएशन घेताना मी असं समजत असे की बाबांची किरणं माझ्या शरीरावर येत आहेत व मी बरी होत आहे. जून २०२२ मध्ये माझी ट्रीटमेंट पूर्ण झाली व मी आज कॅन्सरमुक्त आहे.

या अनुभवानंतर मला असं जाणवलं की सर्वांनी हे ईश्वरी ज्ञान घेणं किती आवश्यक आहे. जर मी ह्या ज्ञानमार्गात नसते तर मी परिस्थितीशी दोन हात करू शकले नसते. बाबांमुळे मला सर्वांचे सहकार्य मिळाले. उत्तम डॉक्टर्स व वेळच्या वेळी उपचार मिळाला व ईश्वरी परिवार व लौकिक परिवाराकडून सहकार्य लाभले. इलाज झाल्यावर मी बाबांना धन्यवाद देण्यासाठी मधुबनला (मा.आबू) गेले. व बाबांना मनापासून धन्यवाद दिले. भक्तीमार्गात वाचलं होतं. 'जीवाला वाटतं पंढरीला जावं जावं ! आईबापां भेटावं, बंधु पुंडलिका लुटावं ।' तसं मी बाबांचे प्रेम लुटण्याचा अनुभव मधुबनमध्ये घेतला. जणू बाबांना कडकडून भेटले.

हा अनुभव वाचणाऱ्या माताभगिनींना हे सांगू इच्छिते की स्तनाचा कर्करोग असेल, जर कुठे बगलेत अथवा शरीरात कुठेही गाठ जाणवल्यास त्वरीत डॉक्टरचा सल्ला घ्या व उपचार करा.

शेवटी एवढंच म्हणते बाबांच्या प्रेमामुळे व सर्वोच्च ज्ञानामुळे, सर्वांच्या सहयोगामुळे मी कर्करोगावर मात केली. ईश्वराच्या सोबतीमुळेच हा लढा मी जिंकू शकले.

***

## साथ

तळपत्या उन्हामध्ये
शीतल छाया बनून
जीवनाच्या लाटेवर
बाबा तू नाव बनून
लटपटती पाय माझे
तेव्हा धरीलास हात
माझ्या बाबाची साथ
माझ्या बाबाची साथ ।।

काळोख्या अंधारात
बाबा तू दिव्य ज्योत
काटेरी दुनियेत केली
सुखाची बरसात
माझ्या बाबाची साथ
माझ्या बाबाची साथ ।। १ ।।

उजळले जीवन
तुझ्यामुळे बाबा
राहिली नाही मनात
अभिमानाला जागा
तुझ्या शक्ती ज्ञानाने
जीवन झाले सार्थ
माझ्या बाबाची साथ
माझ्या बाबाची साथ ।। २ ।।

सरता सरेना बाबा
तुझ्या उपकाराची खाण
माझ्या जीवनात भरला
आनंद उजळले जीवन
झाली सुखाची बरसात
माझ्या बाबाची साथ
माझ्या बाबाची साथ ।। ३ ।।

ब्र.कु. लता, देगलूर

***



# निश्चिंत जीवनशैली

ब्र.कु. शिवानी, दिल्ली

आपल्या समाजात विविध प्रकारची माणसे वावरताना आपण बघतो. त्या प्रत्येक माणसाचे विविध संस्कार असतात. प्रत्येक जण त्यामुळे आपआपल्या संस्कारानुरूप कार्य करत असतो. आता हेच बघा ना, जसे एखाद्या बागेमध्ये फक्त एकच प्रकारची फुले असतील तर त्यात स्वारस्य राहत नाही; पण हेच जर विविध प्रकारची फुले जर त्या बागेत असतील तर त्या निरनिराळ्या फुलांचा रंग, आकार, त्या प्रत्येक फुलाचा सुगंध आपल्याला मोहीत करतो. तो फुलांचा ताटवा बघून आपले मन प्रसन्न होते. असेच आपल्या समाजातील माणसांचे आहे. जर प्रत्येक माणसाचे एकच संस्कार असतील तर ती एक प्रकारची एकाधिकारशाही होईल. पण आपल्याला बहुआयामी वैचारिक समाजाची गरज आहे. फक्त त्या निरनिराळ्या संस्कारांचा पोत हा चुकीच्या पद्धतीचा नको. जेव्हा प्रत्येकाचे स्वभाव-संस्कार हे स्वत:च्या व समाजाच्या मूल्यांची पायमल्ली करतात तेव्हा त्या देशाचे अध:पतन झाल्याशिवाय राहत नाही. आपण इतरांशी व्यवहार करताना एवढीच काळजी घ्यायची की दुसऱ्यांचे स्वभाव-संस्कार आपल्या विचारांहून जरी वेगळे असले तरी त्याकडे आपण नकारार्थी दृष्टीकोनातून न बघता सकारात्मक पद्धतीने बघायला हवे. हा दुसऱ्याचा वैयक्तिक विचार त्याच्या संस्कारातून झालेला आहे. तेव्हा त्याचा उहापोह करून माझे मन, मी का विषण्ण करून घेऊ?

आज प्रत्येकजण चिंतेने ग्रासला आहे. आजच्या माणसाचा जन्म हा विकारांमधून झाला आहे. त्यामुळे भय, चिंता, नैराश्य या स्वाभाविक गोष्टी आहेत असेच सर्वांचे मत आहे. आपण दुसऱ्यांची काळजी घेता घेता चिंतेचे दाट वलय निर्माण करतो. त्या दाट धुक्यामध्ये आज माणूस हरवून गेला आहे. दिवसागणीक नैराश्याच्या गर्तेत सापडत आहे. यातून जर माणसाला बाहेर काढायचे असेल तर चांगल्या विचारांची जोपासना करायला हवी. जेव्हा आपले विचार हे चांगले, सकस असतील तर ते आपल्या कृतीतून उतरल्याशिवाय राहणार नाहीत. सर्वात प्रथम दुसऱ्याला समजून घेताना आपण खंबीर राहायला हवे. दुसऱ्यांचे संस्कार माझ्या मन:पटलावर काहीही बदल करू शकणार नाहीत, जरी ते कितीही नकारार्थी असले तरी, हे लक्षात ठेवायला हवे ! जर आपण सुद्धा नकारार्थीच विचार केला तर त्या वातावरणामध्ये आपण एक प्रकारची भरच घालतो.

उपाय शोधण्याऐवजी आपण चुकीच्या विचारांचे खतपाणी त्या गोष्टींमधे घालतो. आपल्याला आपले मन प्रसन्न ठेवायचे असेल तर दुसऱ्यांचे विचार न बदलता आपण आपल्या मनावर कसा संयम ठेवायचा हे बघितले पाहिजे. समोरच्याने माझ्याशी कसा व्यवहार केला हे बघण्याऐवजी मी त्यांच्याशी कसा वागलो याचा विचार व्हायला पाहिजे. दुसऱ्यांना समजून घेण्याची विशालबुद्धी आपल्यात हवी. पण त्यासाठी आपली मानसिक स्थिती श्रेष्ठ असायला हवी. ही मानसिक स्थिती सर्व बिघडलेले संबंध सुधारण्यास साह्य करते. आणि ही मन:स्थिती सदैव शाबूत पाहिजे. फक्त एका गोष्टीपुरतीच किंवा काही वेळेपुरतीच ती मर्यादीत नको ! एकदा का आपण संयमाची भूमिका घेतली की आपसूकच ती आपल्या अंगवळणी पडेल व कोणत्याही परिस्थितीत मी माझी मानसिक स्थिती किंवा शांती डळमळू देणार नाही. मग ते नकारार्थी विचार असोत वा इतरांचे वाईट संकल्प, माझी मन:शांती ढळणार नाही. याचाच अर्थ आपण वातावरणात एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा निर्मिती करतो आणि त्याची प्रकंपने सर्वत्र पसरल्याशिवाय राहात नाहीत. इतरांच्या विषयी असलेल्या शुभभावना व शुभकामना ह्या वातावरण निर्मितीस पोषक ठरतात व दुसऱ्यांमध्ये बदल (सकारात्मक)

घडवण्यास कारणीभूत होतात. त्यासाठी स्वतःला आपण आतून खंबीर बनवणे गरजेचे आहे.

आता ही आपली मानसिक स्थिती उंचावण्याचा सहज साधा उपाय आहे, ध्यान धारणा ! आजकाल आपण शरीराचे स्वास्थ्य व्यवस्थित राहण्यासाठी विविध प्रकारची पथ्ये पाळतो. विशिष्ट गोष्टींचा आपण आपल्या आहारात समावेश करतो व अनावश्यक गोष्टींपासून दूर राहतो. आता हा झाला शरीराचा आहार; पण माझ्या बुद्धीला, योग्य तो आहार मिळत आहे का? माझे मन माझ्या इच्छेप्रमाणे वागते आहे, की नको त्या गोष्टींमध्ये भरकटते आहे ? मन हे फारच चंचल असते, ते सदा भरकटतच असते. तेव्हा अशा मन-बुद्धीला योग्य तो पोषक आहार देण्याची गरज आहे आणि ती सहज साध्य होते एक भगवंताच्या ध्यानाने ! आज जीवनात सात्विकताच लोप पावली आहे. आपण ज्या मर्यादेत राहात होतो त्या विचारांची, मर्यादेचीच मुळी पायमल्ली झाली आहे. आता ही मर्यादेची रेष ओलांडली तर काय होते हे माहीतच आहे. आपल्या आत्मारूपी सीतेचे अपहरण या विकाररूपी रावणाने केल्यामुळे आपण या विकारांच्या जंजाळात अडकलो आहोत. चिंता, निराशा या आपल्या अंगवळणी पडल्या आहेत. तर यातून बाहेर येण्यासाठी भगवंताचे ध्यान धरणे ! भगवंताशी मन-बुद्धीने एकरूप होऊन सर्व गोष्टींचा विसर पडणे म्हणजे ध्यान ! तर अशी ध्यानधारणा फक्त अर्धा तास दिवसातून करा. हळूहळू त्याची कालमर्यादा वाढवत न्या व त्या परमात्म्याच्या शक्तींचा आपल्या अंगी संचय करा की, जेणेकरून माझे मन कुठल्याच आसक्तींना बळी पडणार नाही. माझे मन आणि बुद्धी एकत्रितपणे त्या भगवंतामध्ये एकाग्र होईल व माझे मन भरकटण्यापासून थांबेल. आपल्या अंगी योग्य निर्णय करण्याची शक्ती येईल व दुसऱ्यांच्या नकारार्थी विचारांचा माझ्यावर काहीच परिणाम होणार नाही. तसेच आपण या सर्व गुण, शक्तींनी भरपूर झाल्यामुळे दुसऱ्यांना समजून वा सामावून घेऊ शकतो. जेव्हा माझे मन, बुद्धी माझ्या अनुसार वागतील तेव्हा मी इतरांच्या कुठल्याही मोहाला बळी पडू शकणार नाही. अशामुळे मी सदा आनंदी, प्रसन्न असेन आणि तीच तर आज काळाची गरज आहे. सर्वजण दुःखी आहेत, जर त्यांना आधार द्यायचा असेल तर आधी मी सुखी असायला हवे. या सुख, आनंदाच्या लहरी मी जेव्हा इतरत्र पसरवतो तेव्हा ती व्यक्तीदेखील याचा अनुभव घेते. आपोआपच मग आपल्या नातेसंबंधातील कडूपणा दूर होऊन नात्यांमध्ये गोडवा निर्माण होतो. त्याचबरोबर दुसऱ्यांना माफ करणे पण सहज शक्य होते. एकदा ध्यानधरणेची सुरुवात तर करून बघा, मग त्या गोडीची चवच काही निराळी अनुभवाल ! अतींद्रिय सुखाचा अनुभव झाल्याशिवाय राहणार नाही. एक हिंमतीचे पाऊल उचललेत तर भगवंत हजारो, लाखो मदतीचे हात तुमच्यापुढे करेल व त्याची छत्रछाया तुम्हाला सर्व गोष्टींपासून सुरक्षित ठेवील. मकरसंक्रांतीला आपण तिळगूळ सर्वांना वाटतो व तिळगूळ घ्या, गोड गोड बोला ! असे सांगतो. पण तो फक्त एक दिवसच अशा पद्धतीने साजरा करायचा नसतो तर, प्रत्येक दिवस, प्रत्येक क्षण हा सर्वांशी हसतखेळत, गोडीगुलाबीने कसा साजरा करायचा याचा प्रत्येकाने विचार करा जेणेकरून सर्वत्र मांगल्याचे दिवस येतील व प्रत्येक जण सुखी, आनंदी समाधानी होऊन या भारत भूमीवर स्वर्ग स्थापनेस, भगवंतास साह्य करेल.

**(शब्दांकन – ब्र.कु. नितीन, कुवेत)**

***

---

(पृष्ठ क्र.४ वरून)

रोजच्या ज्ञानमुरलीत आपण प्रश्नोत्तराचे रूप अभ्यासतो. ही पद्धत मनमोहिनी दीदींनी रुजवली. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांचे विद्यार्थी जीवन सर्वांनी पाहिले. रोजच्या ज्ञानवर्गास वेळेआधी हजर राहत. नुसते नव्हे तर हातात वही-पेन घेऊन. इतक्या त्यागमय आणि तेजोमय साधिकेच्या जीवनातून आपण वेचू तितके कमीच आहे.

***

**सुविचार**

ज्या गोष्टी कोणाच्या स्वप्नातही येणार नाहीत, अशा गोष्टी राजयोगाने साध्य होतील.



# ब्रह्मचर्य - एक साधना

ब्र.कु. छाया, मुलुंड पूर्व

कोणत्याही साधनेच्या किंवा तपस्येच्या मार्गाने जाणाऱ्या प्रत्येक तपस्वी साधकाला ब्रह्मचर्य या सर्वश्रेष्ठ व्रताचे पालन करावे लागते. ब्रह्मचर्य या शब्दाचा अर्थ आहे. ब्रह्मासमान दिनचर्या आणि ऋतूचर्या.

बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले. आचरण + उच्चारण + मनन म्हणजेच संपूर्ण ब्रह्माचारी. ब्रह्मचर्य म्हणजे केवळ तनचर्या किंवा शारीरिक पवित्रता एवढाच सीमित अर्थ नाही. ब्रह्मचर्य हा संपूर्ण ब्रह्माचारी बनण्याच्या प्रक्रियेतील पहिला टप्पा.

'ब्रह्मचर्येण तपसा देवा मृत्युमपाघ्नत' म्हणजे ब्रह्मचर्य पालन हेच एक तप आहे आणि या तपाचरणाद्वारे देव-देवतांनी मृत्युवर विजय मिळविला असे सामवेदात वर्णन आहे. अखंड ब्रह्मचर्य म्हणजे संपूर्ण ब्रह्माचारी. जी व्यक्ती संपूर्ण ब्रह्माचारी आहे. तिलाच ब्राह्मण या नावाने संबोधले जाते. म्हणतात ना, ''ब्रह्म जाणी तो ब्राह्मण'' ब्रह्माच्या आचरणाचे अनुकरण करून जीवनात उतरविणारा तो ब्राह्मण. ब्रह्मतत्वात वास करणाऱ्या परमात्म्याची जो त्याच्या सत्य स्वरूपात आठवण करतो तो ब्राह्मण. आज कलियुगात, ब्राह्मण ही उपाधी प्राप्त होणारी व्यक्ती संपूर्ण ब्रह्माचारी असेलच असे नाही. असे म्हणतात, रावण हा देखील ब्राह्मणच तर होता. परंतु संपूर्ण विकारी आणि पतित भ्रष्टाचारी म्हणजे रावण. आज कलियुगी मानवाला पतित कोण? आणि पावन कोण? संपूर्ण विकारी कोण? आणि संपूर्ण निर्विकारी कोण? याची खरी व्याख्या कळलेली नसल्यामुळे त्याला हे ही माहीत नाही की, रावण नावाची कोणी व्यक्ती नसून प्रत्येक व्यक्तींमधील हिंसक विकारी वृत्ती म्हणजेच रावण आहे. केवळ कर्मकाण्ड करणे म्हणजेच ब्राह्मण नव्हे तर उच्च कोटीचे संस्कार धारण करणारा तोच खरा ब्राह्मण. ब्राह्मण केवळ एक जात नाही किंवा एक धर्म किंवा एक पंथ नाही तर सुसंस्कारी आचरण, सुमधुर उच्चारण आणि सात्विक मनन चिंतन करणारा म्हणजेच खरा ब्राह्मण. म्हणतात, ना एक म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत. एक तर काम किंवा राम ज्याच्या प्रत्येक रंध्रात राम आहे. ज्याच्या प्रत्येक श्वासात राम आहे. तोच काम विकारापासून मुक्त होऊ शकतो. मग राम तरी नेमका कोण? दशरथ पुत्र श्रीराम की पार ब्रह्मतत्त्वात राहणारा शिवराम? की प्रत्येक शरीरात असणारा स्वतंत्र आत्मा आत्माराम? याची जोपर्यंत सत्य ओळख होत नाही. तोपर्यंत राम या नावासाठी व्यक्ती युद्धच करेल मग ते वैचारिक युद्ध असेल अथवा बाहू युद्ध असेल. ज्याने पार ब्रह्मतत्वात राहणाऱ्या निराकार परमात्मा याला म्हणजेच शिवरामाला ओळखले तोच संपूर्ण अहिंसक आत्मा, सर्व प्रथम सूक्ष्म विकारांना, हिंसेला किंवा मायेला जिंकू शकतो. आपले मन, परमात्मा शिवराम याचे सत्य स्वरूपावर स्थिर राहू शकते. असा आत्मा मायाजीत जगतजीत बनू शकतो.

काम लोलुप वासनांध व्यक्ती अध्यात्माचा रस घेऊच शकत नाही. म्हणूनच श्रीमत् भगवत गीतेत म्हटले आहे. ''काम विकार नर्काचे द्वार'' गति सद्गतिचा श्रेष्ठ मार्ग अध्यात्मातून सुरू होतो. अध्यात्म म्हणजे स्वतःला देह न समजता आत्मा समजणे. आत्म स्वरूपात टिकून परमात्म्याच्या सर्व संबंधाचा अनुभव घेणे हेच खरे अतींद्रिय सुख. जीवनात परमआनंद प्राप्त होतो, तेव्हा जीवन हे एक गाणे होते. आतून निघालेला प्रत्येक सुर चंद्र होतो. जीवनातील प्रत्येक सांसारिक आधार निखळून पडतात. तेव्हा मनुष्य आत्मा स्वतंत्र जीवनाचा अनुभव करतो. जिथे पराधीनता संपून जाते. अशा अमृतमय जीवनाचा अनुभव करण्यासाठी देहात राहून देहातीत होण्यासाठी या चार गोष्टीकडे लक्ष हवे. १) चाम २) काम ३) राम ४) धाम

(पृष्ठ क्र.१८ वर)

# परीकथा

## (भाग ५)

# परमात्मा व त्याची दिव्य कर्तव्ये

ब्र.कु. रेखा, देगलूर



मागच्या चार भागात माझ्या मुलीच्या (राधेच्या) स्वप्नातील परीची कथा मी तुम्हाला सांगितली. खरं पाहिलं तर परीच्या माध्यमातून राधेला स्वप्नाद्वारे बाबाच ज्ञान देत होते. तुम्हा सार्‍यांच्या या लाडक्या राधेला गोष्टीच्या रूपात साप्ताहिक कोर्स ते ते सांगत होते. गोष्टीच्या रूपात असल्यामुळे राधा खूप मन लावून ऐकत होती. ती आता खूपच आनंदात राहू लागली होती. तिच्या आनंदात आणखी भर पडली होती ती म्हणजे तिचे प्रिय काका व काकू, तिचा लाडका दादा सुद्धा आला होता. तिचे काका काकू मुंबईला राहतात. तिच्यासाठी मुंबईहून बरंच काही तिच्या आवडीचं आणले होते. त्यात खेळणीही होती. त्यात तिला एक विशेष म्हणजे तिच्या आवडीचा परीचा ड्रेस होता. तिचा परीचा ड्रेस तिच्या स्वप्नातल्या परीच्या ड्रेस सारखाच होता. ते पाहून तिला खूप आनंद झाला. तो ड्रेस घेऊन ती आनंदाने उड्या मारत होती. राधेने आपल्या काका-काकूंना सुद्धा तिच्या परीची कथा मोठ्या आवडीने सांगितली होती . त्यांनीसुद्धा तिची कथा खूप आवडीने ऐकली व तिला म्हणाले, ''बाळ राधा तुझ्या परीची कथा आम्हाला खूप आवडली. तुझी परी सुंदर आणि परीची कथा सुद्धा त्याहून सुंदर आहे.''

मग असे चार-पाच दिवस खूप खूप मजेत गेले. राधा सुद्धा काका काकूंवर खूप खूप प्रेम करते.

तिच्या दादा सोबत ती खेळात खूप रंगून जायची. त्याच्याशिवाय तिलाही करमत नव्हतं. तो सुद्धा तिच्यात खूप रमला होता.

रोजच्याप्रमाणे आम्ही सकाळी आमची सर्व कामे आटोपून घेत होतो. तेव्हा राधाचा खूप जोर जोरात आवाज येत होता. आम्ही सर्वजण जाऊन पाहतोत तर काय राधा तिच्या दादाला जोर जोरात हलवून उठवत होती. ''दादा उठ ना रे ! दादा उठ ना रे!'', असं म्हणत होती. मी विचारले, ''बाळा तू त्याला का उठवतेस ?'' यावर ती थोडी हिरमुसली होऊन बोलली, ''आई तो उठतच नाही बघ. मला की नाही त्याला माझ्या परीची गोष्ट सांगायची आहे. बघ त्याला उठव ना ग!'' तेवढ्यात तिचे काका काकू तिच्या अगदी जवळ येऊन बसले. तिचे काका तिला जवळ घेऊन म्हणाले, ''बाळ राधा तुझ्या परीची गोष्ट मला सांग ना! बाळा मी ऐकतो. तुझी काकू ऐकेल, मग नंतर मात्र तुझा दादा उठला की त्याला सांग, चालेल का ?'' राधा खूप खुश झाली.

राधा सांगू लागली, ''जिच्या मस्तकावर चमचम चमकणारा हिरा आत्मा आहे, तीच परी मला आजही भेटली. मी तुम्हाला आधीच सांगितले होते ना!''

''काका ती खूप सुंदर आहे हो! ती जेव्हा जेव्हा स्वप्नात येते ना, माझ्यासाठी काहीतरी घेऊन येत असते. कधी ती फळे कधी गोड रस. आज परीने माझ्यासाठी एक रस आणला होता. खूपच स्वादिष्ट होता. काका मग की नाही तिने जादूची कांडी अशी गोल फिरवली. मग काय आम्हा दोघांना बसण्यासाठी दोन सुंदर अशी मखमली आसनं आली. मखमली असल्यामुळे त्यावर बसल्यानंतर मला खूपच छान वाटत होतं. काका मला तिने परमात्मा व त्याची दिव्य कर्तव्य कोणती आहेत. ते सांगितले.'' राधा खूप उत्सुकतेने सांगत होती. राधा परमपिता कसा आहे तुला माहिती आहे ना! मी त्यावर म्हणाले, ''परमात्मा तर निराकार आहे मी जशी बिंदू माझा बाबा पण बिंदू आहे.'' परी म्हणाली, ''बाळा तो एक बिंदू रूपात निराकार असल्यामुळे त्याला कुठलं शरीर नाही, निराकार आहे.'' परी म्हणाली, ''बाळा निराकार परमात्मा आपल्या सृष्टीवर येऊन एका साधारण वृद्ध मनुष्याच्या शरीरात प्रवेश करतात. म्हणजेच त्यांच्या शरीरात ते अवतरीत होतात.

परमात्म्याच्या अशा जन्माला दिव्य जन्म किंवा परकाया प्रवेश असं म्हणतात.'' मी म्हणाले, ''परी खूपच गमतीशीर आहे बघ. परमात्म्याने आणि माझ्या शरीराचा आधार घेतला तर मला खूप मजा आली असती बघ.'' त्यावर परी हसून म्हणाली, ''बाळा तू तर खूपच लहान आहेस व परमात्म्याला एक साधारण वृद्ध मनुष्याच्या शरीराची गरज होती, म्हणूनच ते विश्व कल्याण करण्यासाठी एका साधारण वृद्ध मनुष्याच्या मुखाद्वारे ज्ञान व राजयोगच शिक्षण त्यांनी दिलं. ज्या शरीरात ते प्रवेश करतात त्यांचं नाव त्यांनी ब्रह्मा असं ठेवलं.''

राधा फार थक्क होऊन ऐकत होती. त्यानंतर परीने मला आणखी जवळ घेऊन माझ्या गालावरून हात फिरवत मला विचारलं, ''बाळा तुला समजलं ना?'' मी म्हणाले, ''हो! समजलं'' यावर परी म्हणाली, ''परमात्मा शिव हा आपला पिता आहे, शिक्षक आहे, सद्गुरु च्या रूपात ब्रह्माच्या द्वारे ते आपल्याला ज्ञान सांगतात.''

''बाळ राधा, परमात्म्याची तीन कर्तव्ये आहेत. ब्रह्मा, विष्णू, शंकर यांची ते रचना करतात. जगात मारामाऱ्या भांडण अत्याचार होतो ना, धर्माची अति ग्लानि होते. परमात्मा या सृष्टीवर येतात व ते ज्यांच्या शरीरात प्रवेश करतात त्यांचे कर्तव्यवाचक नाव 'प्रजापिता ब्रह्मा' ठेवतात. म्हणजेच 'प्रजापिता ब्रह्मा' द्वारे शिव परमात्मा, सत्ययुगी दैवी सृष्टीची स्थापना करतात. कलियुगाचा अंत व सत्ययुगाचा सुरुवातीचा काळ यामधील संधीकाळास 'पुरुषोत्तम संगम युग' म्हणतात. याच युगात शिव परमात्मा अवतरित होतात.''

''ब्रह्माद्वारे स्थापना करतात. शंकराद्वारे कलियुगाचा विनाश करतात. विष्णूद्वारा संगोपन करतात. ही सर्व कर्तव्ये शिव परमात्मा यांच्याद्वारे करून घेतात.'' मी परीला विचारले, ''परी खरंच का ग या दुनियेचा विनाश होणार आहे का? आणि नवी दुनिया स्थापन होणार आहे का?''

परी म्हणाली, ''हो बाळा खरंच आहे. या सृष्टीवर मोठे परिवर्तन अपेक्षित आहे व नवसृष्टी येऊ पाहत आहे.'' परी पुढे म्हणाली, ''बाळ राधा, विष्णू देवता कशी दिसते तुला माहीत आहे का?''

राधा म्हणाली, ''विष्णू देवतेच्या डोक्यावर एक सोन्याचा मुकुट असतो आणि चार हात असतात.'' यावर परी म्हणाली, ''हो बरोबर आहे! दोन हात श्री लक्ष्मीचे व दोन हात श्री नारायणाचे. विष्णू देवतेच्या मस्तकावर सोन्याचा रत्नजडित मुकुट तो म्हणजे संपूर्ण विश्वाचा सांभाळ करण्याचे प्रतीक आहे.'' मी परीला म्हणाले, ''अय्या मला माहीतच नव्हतं बघ विष्णूस चार हात का आहेत? ते व त्यांच्या डोक्यावर मुकुट का आहे ते आता मला कळलं बघ.''

त्यावर परी म्हणाली, ''बाळा, विष्णू देवतेच्या मस्तकाभोवती प्रकाश असतो, तो दिव्य प्रकाश म्हणजे पवित्रतेचा प्रकाश असतो. तू मोठी झाल्यानंतर तुला हे सर्व काही समजेल. ठीक आहे ना बाळ राधा!''

मी मात्र प्रेमाने आपली मान डोलावली.

परी म्हणाली, ''बाळा विष्णू देवतेच्या हातात काय काय असतं?''

मी पटकन उत्तर दिले, ''शंख, चक्र, गदा आणि पद्म. हे विष्णू देवतेच्या हातात असतात.'' परी म्हणाली, ''बरोबर शंख म्हणजे आपल्याला साऱ्या विश्वात आपण सर्वांना ज्ञान सांगायचं आहे प्रत्येकाच्या कानात आपण ज्ञानाचा शंख वाजवायचा आहे. ज्ञान घोषाद्वारे इतरांची सेवा करण्याचं हे प्रतीक आहे.''

''चक्र म्हणजे आपण स्वतःच स्वतःचं दर्शन करायचं, आत्म्याचं तसंच या सृष्टीचक्राचं ज्ञान बुद्धीत स्मरत राहणे म्हणजे राजयोगाची साधना आहे. आपण स्वतःला तपासायचे आणि परिवर्तीत करायचे. आता तिसरं म्हणजे गदा. गदेद्वारे मायेवर म्हणजेच आपल्यातल्याच वाईट गोष्टींवर विजय मिळवायचा आहे. चौथं म्हणजे कमळ आहे. बरं कमळ कुठे असते? ते सांग बरं.'' मी पटकन म्हणाले, ''कमळ तर चिखलात असते ना ग!'' परी हसत हसत म्हणाली, ''बाळा कमळ चिखलात असते; पण चिखलाचा स्पर्श कधीच कमळाला होत नाही. चिखलात राहून सुद्धा ते अलिप्त असते.आपल्याला देखील कमळासारखे बनायचं आहे घरात राहून आपण सर्वांशी प्रेमाने शांतीने सुखाने राहायचं आहे.'' एवढे बोलून परी माझ्या गालावरून प्रेमाने हात फिरवू लागली व म्हणाली, ''राधा, तुला समजलं ना मी काय सांगितलं ते? बाळा तू की नाही सर्वांना आपल्या घरी आजूबाजूला या सर्व गोष्टी सांगशील ना !'' मी परीला म्हणाले, ''तुला पक्के आश्वासन देते. मी हे सगळे सर्वांना सांगेन.'' एवढे बोलून मी तिच्याजवळ जाणार तिचा हात पकडणार या विचारातच होते आणि ती एकदम दिसेनाशी

झाली. मी आजूबाजूला पाहिले; पण ती दिसलीच नाही बघा.

राधा थोडीशी हिरमुसली होती, मग तिच्या काकांनी तिला जवळ घेतले. तिला समजावू लागले, ''बाळा ती तुला चार ते पाच दिवसात एक नवीन गोष्ट सांगत आहे ना! तू तिला इथे पकडून ठेवलीस, तर तुला ती नवीन गोष्ट कशी घेऊन येणार? ती जर गेली तरचं तुझ्यासाठी नवीन गोष्ट आणणार ना बाळा!''

राधेला ती गोष्ट पटली तिची कळी खुलली व ती लगेच म्हणाली, ''हो काका मला लक्षातच नव्हतं चार-पाच दिवसात ती आणखीन एक नवीन गोष्ट घेऊन येईल.'' काका म्हणाले, ''बाळा या कथेतून आपण हे लक्षात घ्यायचं की विष्णू देवतेचे हे अलंकार शंख, चक्र, गदा व कमळ हे त्यांनी धारण केलेत. त्यांचं रहस्य जाणून जर आपण आपल्या जीवनात धारण केले, तर आपण नराचा श्री नारायण, नारीची श्री लक्ष्मी पद प्राप्त करू शकतो. आपण सर्वांनी ज्ञान, पवित्रता, शांती, प्रेम, आनंद, शक्ती हे सर्व गुण आपल्यात धारण केले पाहिजे. ते सर्वांना देत गेलं पाहिजे तरच आपण श्री नारायण व श्री लक्ष्मी बनू शकतो, बाळा हा शिवबाबांचा संदेश आपल्याला प्रत्येकाला द्यायचा आहे. देशील ना बाळा?'' राधा म्हणाली, ''काका मी तर परीला प्रॉमिस केले आहे की मी हा संदेश सर्वांनाच देईन.'' तेवढ्यात तिचा दादासुद्धा उठला होता ती दादासोबत खेळण्यासाठी त्याच्याकडे धावत गेली. आम्ही सर्वांनी शिवबाबांना धन्यवाद देऊन मग बाबांच्या आठवणीत दैनंदिन कामाला सुरुवात केली.

***

---

(पृष्ठ क्र.१५ वरून)

चाम म्हणजे चर्म. चर्मदृष्टी म्हणजे दैहिक दृष्टी, देहाला पाहणारी विकारी दृष्टी आणि देहातील आत्म शक्तीला पाहून आत्म भानांत समोरच्या व्यक्तीबरोबर व्यवहार करणारी ती आहे. - निर्विकारी दृष्टी ! आज मानवाच्या दृष्टीतील पवित्रता खंडीत झालेली आहे. त्याला वयाचे किंवा नात्याचेदेखील भान राहिले नाही. कामांध व्यक्ती शारीरिक आकर्षणामुळे वासनेचा गुलाम बनतो. जो पुरुष प्रत्येक स्त्रीला माता, भगिनी किंवा आपली कन्या समजतो. तोच पुरुष अखंड ब्रह्मचारी आहे आणि जी स्त्री प्रत्येक पुरुषाला आपला भाऊ, वडील, मुलगा या दृष्टीकोनातून पाहील तेव्हा ती अखंड ब्रह्मचारीणी होऊ शकेल. विद्वान ऋषी अष्टावक्र यांनी भर सभेत सर्व पंडीतांना चांभार म्हटले कारण ते पंडीत स्वत:ला ज्ञानी समजत होते. परंतु अष्टावक्र यांच्या देहाकडे पाहून उपहास करू लागले. व्यंगाबद्दल चर्चा करू लागले अशी दैहिक दृष्टीने पाहणाऱ्याला त्यांनी चांभार असे संबोधले.

मंदिरात जातांना भक्तगण चामड्याच्या वस्तू मंदिराच्या बाहेर ठेवतात. परंतु चामड्याचा देह, देहाचे आकर्षण, देहभान, देह अहंकार, घेऊन मात्र मंदिरात जातात दैहिक दृष्टी वृत्ती काम विकाराला जन्म देते. काम विकार केवळ दैहिक अपवित्रता नसून वासना किंवा कामना यांच्याद्वारे मनात उद्भवणाऱ्या विकार वश इच्छा देखील काम विकाराचा अंश आहे. कारण काम विकारातूनच क्रोध, लोभ, मोह, अहंकार या विकारांची उत्पत्ती होते. काम विकार एक, दुर्बलता आहे, तर ब्रह्मचर्य एक शक्ती आहे. आपले जीवन उपभोगासाठी नसून समाजाच्या उपयोगासाठी आहे. ही संकल्पना ज्याने मनात रूजवली तोच अखंड ब्रह्मचारी नि:स्वार्थ भावनेने समाजाचे कल्याण करू शकतो. काम विकाराची पूर्ती करून काम विकाराची तृप्ती होत नाही तर आत्म संयम, ईश्वरी नियम यांचे पालन केल्यानेच विकारांचे अस्तित्व नष्ट करता येते. तेव्हाच राम म्हणजे परमात्मा शिवराम जो सर्व आत्मांचा पिता आहे, पवित्रतेचा सागर पतित पावन आहे, त्या ईश्वराबरोबर सर्व संबंध जोडून मनुष्य आत्मा निर्विकारी जीवन जगू शकतो व दैवी संस्कार धारण करून राम राज्यात पुन्हा प्रवेश करू शकतो. धाम म्हणजे प्रत्येक आत्म्याचे घर परमधाम, मुक्ती धाम जिथे परमपिता परमात्मा यांचे वास्तव्य आहे. ईश्वरी स्मृतीने पुन्हा आत्म्याला मुक्तीधामात प्रवेश करता येतो. तसेच जो मनुष्यात्मा पवित्र बनून परमात्म्याच्या स्मृतीत राहून निर्विकारी जीवन जगतो व तो सुखधामात वैकुण्ठ किंवा नवीन दुनियेत प्रवेश करू शकतो. अशा निर्विकारी पावन दुनियेचे आगमन पुन्हा भारतात होत आहे. त्याची पूर्वतयारी म्हणजे संपूर्ण ब्रह्मचारी जीवन !

***



ब्रह्मावत्सांकरिता

# शिकण्यासारखं बरंच काही...

(भाग – ६)

## वेळेचे महत्त्व

ब्र.कु. सुभाष, ज्ञानसरोवर, आबू पर्वत

जगाच्या इतिहासात डोकावून पाहिले तर वेळेचे महत्त्व जाणणारे अनेक महानुभाव होऊन गेले. डिकन्स, अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष हेन्री विल्सन, महात्मा गांधीजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक प्रभृतींची नावे घेता येतील. ईश्वरी ज्ञान यज्ञातील वेळेबाबत अत्यंत दक्ष असणाऱ्या जगदीशभाईंचे नावही असेच ओघाने पुढे येते. 'स्वत:चा वेळ फुकट घालवायचा नाही तसेच दुसऱ्याचाही' हा कटाक्ष असे भ्राताजींचा.

दिल्ली सेवाकेंद्राच्या पाण्डव भवन येथील 'पुष्पादीदी' एकदा अनुभव कथन करत होत्या. जगदीशभाई प्रत्येक गोष्टीत वक्तशीर होते, अमुक वेळेत अमुक काम असे त्यांचे गणित बांधलेलेच असे. स्वत:ही तसे करत व इतरांनाही ती प्रेरणा देत असत. आम्ही कितीही प्रयत्न केला तरी कुठेतरी गणित वर–खाली होते; पण जगदीशभाईंचे मात्र तसे होत नसे. एकदा मी साहस करून त्यांना विचारलेच. ''तुम्ही बरोबर वेळेवर किंवा आधीच कसे काय पोहोचता? कधीच कशी गडबड उडत नाही तुमची?'' त्यावर त्यांनी हसून उत्तर दिले, ''मी कुठेही जायचे असल्यास पुरेसा वेळ हाती ठेवूनच निघतो. वाटेतल्या रहदारीचा, वाहतुकीची कोंडी इत्यादीचा विचार करून निघतो. जर मी ठरलेल्या ठिकाणी वेळेआधी समजा अर्धातास अगोदर पोहोचलो तर आसपासच्या आडोशाला गाडी उभी करतो. काही फोनवरील कामे असतील, कुठे एखाद्या भाषणाची टिपणे काढायची असतील, एखाद्या लेखाची उपमुद्रिते (प्रुफ रीडिंग) तपासायचे असेल तर अशी कामे करतो. लाँग फेलो नावाच्या माणसाने रोज चहाचे आधण येईपर्यंतचा वेळ वापरून 'इन्फर्नो' नावाच्या काव्याचा अनुवाद केला त्याची मला आठवण होते.

अनेकदा भ्राताजी ठरलेल्या जागी लवकर पोहोचले म्हणून सभागृहात किंवा सेवाकेंद्रावर लगेच जात नसत. त्यांचे म्हणणे असे, 'माझ्या तिथे पोहोचण्यामुळे इतर कामात व्यग्र असणाऱ्यांनी हातातली कामे टाकून माझी सरबराई करण्याची मुळीच आवश्यकता नाही. आपण सगळे एकाच ईश्वरी कुटुंबाचे सदस्य आहोत. कुणी उच्च–नीच दर्जाचे नाही, सगळे समान आहोत. आपसांत भाऊ–बहीण आहोत. माझ्या उपस्थितीचे ओझे बनू नये याची मी काळजी घेतो. मला चहा–पाणी काही हवंय नकोय याकडे विनाकारण इतरांचे लक्ष जाता कामा नये. प्रत्येकाचा वेळ महत्त्वाचा आहे.'

असे होते आपले प्रेरणास्रोत आदरणीय भ्राताजी. त्यांच्या जीवनाकडे पाहून समर्थ रामदासांच्या ओळी आठवतात.

'अभ्यासचि करीत जावा। काळ सार्थकचि करावा। जनासहित ।।'

***

### सुविचार

वस्तुतः स्वतःच्या अज्ञानाची जाणीव असणे, हीच ज्ञानाची पहिली पायरी आहे – स्वामी शिवानंद



# माझ्या सर्वप्रथम आध्यात्मिक शिक्षिका

ब्र. कु. आत्मप्रकाश, शांतीवन, आबू रोड

वर्ष १९५७ मध्ये मी दादी जानकीजींना प्रथम भेटलो तेव्हा, मी पतियाला (पंजाब) येथील अभियांत्रिकी महाविद्यालयात शिकत होतो. माझ्यासोबत इंदूरचे ओमप्रकाशभाईजी देखील शिकत होते. पुढे आपल्या संस्थेच्या इंदूर झोनचे ते प्रमुखही बनले. दादींजीनी त्यांना ईश्वरी ज्ञानमार्गाचा परिचय दिला. ओमप्रकाशभाईंनी मला हे ईश्वरी ज्ञान समजाविले आणि आम्ही वसतिगृहात राहत होतो. तिथल्या वास्तव्यातच खाण्या-पिण्याच्या शुद्धीविषयीच्या धारणा अंगीकारल्या आणि मी असे ठरविले की आपण भाड्याने एखादी खोली घेऊन राहिलो तर हे सगळं अजून सुकर होईल. त्या खोलीतच आम्ही ज्ञान-योग सगळं काही करत होतो. त्याकाळात संपूर्ण पंजाबात मिळून चारच सेवाकेंद्रे होती. अंबाला छावणी, अमृतसर, श्रीहरगोविंदपुर आणि शाहबाद. सगळ्या भारतातच त्यावेळेस कमी सेवाकेंद्रे होती. दादीजींचे पतियाळाला येणे घडले होते. दादींनी पाहिलं की, स्वतःचं जेवण ही मुले स्वतःच्या हातानेच बनवितात, अभ्यासही करतात. काही दिवस त्या आमच्यासोबत राहिल्या आणि खऱ्या अर्थाने आमचं संगोपन केले. ईश्वरी ज्ञानमार्गावर चालणारे दोन-चार विद्यार्थी आमच्या व्यतिरिक्त होते, इतकीच काय ती उपस्थितांची संख्या. एक दिवस दादींनी 'सिंधी कढी' आणि 'साबूदाण्याचा हलवा' बनवून आम्हाला ब्रह्माभोजन खाऊ घातल्याची हृद्य आठवण आजही मनात ताजी आहे.

**ईश्वरी सेवेची ओढ :** त्या काळात सेंटरवर राहणाऱ्या बहिणीही फारशा नव्हत्या, सेवाकेंद्रेही नव्हती आणि ज्ञानपिपासा असलेले जिज्ञासूही फार नसत. एखादा जिज्ञासू सेवाकेंद्रावर आला तरी बाबांना बातमी दिली जाई, 'बाबा एका व्यक्तीचा या ज्ञानमार्गात अलौकिक जन्म झाला आहे.' दादीजींना सेवेचा अमाप उत्साह असे. साधन असो, नसो, त्या तयार असत. पतियाळामध्ये अनेक ठिकाणी आम्ही दादीजींचे भाषण घडवून आणले. आम्ही सायकलवर आणि त्या सायकल रिक्षात असे जात असू. गुरुद्वारा, महिला समिती अशा अनेक ठिकाणी सेवा केली. 'ही छोटीशीच जागा आहे, इथे कमी लोकं आलेत मग काय भाषण करणार' अशी संकुचित वृत्ती त्यांची कधीही नसे. आपल्याला ईश्वरी सेवा करायची आहे ही एकच ओढ असे.

**परिस्थितीनुरुप वागणे :** प्राप्त परिस्थितीनुरुप दादीजींचे वागणे असे. कुठलीच कुरबूर नसे. कृष्णलाल मनचंदा नावाचे आमचे चंडीगढमधील मित्र होते. त्यांच्यासोबत अनेक मित्रांना आम्ही ईश्वरी ज्ञानाचा परिचय दिला होता. 'तुमच्या कोणी बहिणी आल्या तर आम्हाला कळवा' असं त्यांनी सांगून ठेवलं होतं. त्यानुसार आम्ही दादीजींना घेऊन चंडीगढला गेलो. तिथल्या काही स्थानांवर दादींचे भाषण झाले. सेवेहून रात्री दहा वाजता अंबाला शहरात पोहोचलो. अंबाला छावणीत असलेल्या सेवाकेंद्रावर पोहोचेपर्यंत अजून रात्र झाली असती म्हणून आम्ही एका धर्मशाळेत उतरलो आणि सकाळी सेवाकेंद्रावर गेलो. सांगायचे तात्पर्य म्हणजे कुठल्याही परिस्थितीत विना-तक्रार त्या राहत. सर्वांशी जुळवून घेत असत.

**प्रथमं यज्ञम् :** ईश्वरी ज्ञान यज्ञ अर्थात् मधुबन सर्वप्रथम, मग आपण व्यक्तिगत मंडळी असा त्यांचा खाक्या होता. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात त्याग भावना, बाबा व ईश्वरी यज्ञाबद्दलचं प्रेम काठोकाठ भरलेले होते. कुणी काही वस्तू आणली तर म्हणत, 'प्रथम मधुबनला बाबांकडे पाठवा'. इतक्या साध्या सुध्या होत्या की विचारूच नका. मी माझ्या गावाला त्यांना बैलगाडीतून घेऊन गेलो होतो. घरातल्या सगळ्यांना त्या अत्यंत प्रेमाने भेटल्या, ईश्वरी ज्ञानाविषयी बोलणं झालं. पुढे माझी आई-वडील, भाऊ-बहीण

सगळेच या मार्गावर चालू लागले.

**आत्मिक प्रेमाची पराकाष्ठा :** एकदा आमच्या कुटुंबाला बाबांनी मुंबईत बोलावले होते. बाबा त्या भेटीनंतर मधुबनला गेले आणि मला दादींसोबत पंधरा दिवस पुण्याला राहायचा योग आला. ठिकठिकाणी जाऊन सेवा केली. फेअर रोडवरील सेवाकेंद्रावर त्या राहत आणि 'क्वार्टरगेट सेवाकेंद्रापर्यंतचे तीन-चार किमी अंतर त्या चालून जात. रस्त्यात मला ज्ञानाबद्दलच्या गुह्य गोष्टी सांगत. क्वार्टरगेटला जाऊन मुरली क्लास करत. ज्ञान सुलभ करून अनुभवाच्या आधारे सांगत. इतकं सुस्पष्ट करून सांगत की कुणाला काही प्रश्न राहत नसे.

**दादींचा छंद :** शांतीवनात त्यांचा रात्रीचा क्लास ज्या ज्या वेळी असे तेव्हा मी आवर्जून उपस्थित राही. मला अनेकदा वाटे, जसे वाळू मुठीत धरली तरी ती निसटून जाते. त्याप्रमाणे हे क्षणही नंतर आठवणीत रूपांतरित होतील. क्लासमध्ये मला समोर बसलेला पाहून त्या मला स्टेजवर बोलावीत असत. 'तू मला काही प्रश्न विचार, मग त्या आधारे मी क्लास करते' असे म्हणत एकदम खेळीमेळीचे वातावरण त्या बनवत असत. मी त्यांना एकदा विचारले, ''दादी तुमचा छंद कोणता आहे?'' त्यावर त्या विचार करू लागल्या. मी म्हटले, ''दादी तुम्हाला एकच छंद आहे. बाबांची वारसदार मुले घडविण्याचा, दृढनिश्चयी मुले संस्कारीत करण्याचा छंद.'' त्यांनी खरोखरीच तशी कर्मसेवा लंडन आणि भारत दोन्ही ठिकाणी केली. काया-वाचा-मनाने अर्पण होणाऱ्या बाबांच्या मुलांचा एक विशाल समूहच तयार केला.

**दादीजींकडून आशीर्वाद :** एकदा असाच दादीजींसोबत व्यासपीठावर होतो रात्रीच्या क्लासच्या वेळी. दादी म्हणाल्या, ''बोल काही''. मी म्हटले, ''दादीजी देहत्यागाच्या वेळी मला कष्ट होऊ नयेत ही इच्छा आहे''. त्या म्हणाल्या, ''तथास्तु''.

**हार-तुरे, मान-सन्मानाच्या पलीकडे :** बाबांच्याप्रमाणे दादीजीसुद्धा अनेकानेक गुणांची खाण होत्या. कोणालाही भेटताना सहजपणे भेटत, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ओझे मनावर पडत नसे. प्रत्येकाला संतुष्ट करत. एकदा यज्ञप्रसाद (टोली) घेताना म्हणाल्या, 'हा माझा पहिला विद्यार्थी आहे.'' मलाही या गोष्टीचा सार्थ अभिमान आहे. मान-अभिमान इत्यादींपासून त्या कायमच निर्लिप्त राहिल्या. बाबांच्या हृदयात त्या आणि त्यांच्या हृदयी बाबाच होते. त्यांच्याकडून अनेकानेक वेळा मार्गदर्शन घेण्याची संधी मला मिळाली हे मी, माझे भाग्यच समजतो. अनेकदा 'ज्ञानामृत प्रिंटींग प्रेस' मध्ये अचानक त्या येत, कामगारांसकट सगळ्यांना यज्ञप्रसाद देऊन आनंदीत करीत असत. त्यांची आज्ञा म्हणजे बाबांचीच आज्ञा असे माझ्यासाठी. मी त्याचे तात्काळ पालन करीत असे. आज त्या नाहीत असं म्हणावंसं वाटत नाही कारण त्यांची सूक्ष्म उपस्थिती, शक्तीशाली प्रकंपने आजही जाणवतात. त्यांच्या शिकवणुकीची पदोपदी आठवण होते, दादीजींना कोटी कोटी प्रणाम!

**(भावानुवाद, ब्र. कु. महेश, पनवेल)**

***

## महाभारतातील यक्षप्रश्न

**यक्ष: रोगी माणसाचा मित्र कोण आणि मृत्यू समीप आलेल्या माणसाचा मित्र कोण?**

युधिष्ठिर: रोगी माणसाचा मित्र हा त्याचा वैद्य असतो तर मृत्यू समीप असलेल्या माणसाचा मित्र दान असतो. मृत्यूसमयी माणसाने दान दिले पाहिजे, म्हणजे समाधानाने प्राणत्याग करता येतो.

स्पष्टीकरण - शरीराच्या आजारासाठी देहधारी डॉक्टर आहेत; पण आत्म्यास जडलेले काम क्रोधादि विकार हे देखील एक प्रकारचे रोग म्हटले जाते. यापासून मुक्तता मिळविण्यासाठी सत्य ज्ञान आवश्यक असते. ज्ञान देण्याकरिताच भगवंताला यावे लागते.

मृत्यूसमय समीप आल्यावर दान करावे हे तर ठीकच आहे; पण जिवंत असतानाही दान करावे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. दान अनेक प्रकारचे असते, जसे- अन्नदान, वस्त्रदान वगैरे. अध्यात्माद्वारे शक्तींचे दान करण्याचा विधी आहे. तसेच कर्माद्वारे गुणदानही करता येते.



# जपान डायरी

(भाग–२)

## बेफिकिर बादशाह

ब्र.कु. रेश्मिता, टोकियो

जपानमध्ये येऊन एव्हाना चार–पाच महिनेच झाले होते. लगेचच मला जपानमधली पहिली–वहिली नोकरी मिळाली. त्यासाठी मला फूकुओकाहून (दक्षिण जपान) टोकिओला रवाना व्हायचे होते. टोकिओमध्ये भाड्याने घर कसे मिळेल असा प्रश्न पुढे आला.

त्यावेळी तिथेही अगदी नियमित मी शिवबाबांचे ध्यान करीत होते. दिवसातून चार तास नित्य–नियमित गहन योग साधना चालू होती. त्यामुळे शिवबाबांची सोबत सतत अनुभवत होते. 'बाबा माझ्या बरोबरच आहेत, मग काळजी कशाला, चिंता ती काय!' ह्या निश्चिंत करणाऱ्या दृढ संकल्पाने, बाबांची निश्चित अशी सोबत अनुभवाला येत होती. सगळं काही त्यांच्यावर सोपवून त्यांच्या प्रेमळ साथीचा आनंद मी क्षणोक्षणी घेत होते. ''हात–हाती देऊनी, चालले मी संगती,'' आणि सगळं काही बाबाच करत होते, हे त्यावेळी प्रकर्षाने जाणवले. नवीन नोकरी बाबतही हाच अनुभव आला. तूच कर्ता आणि करविता.

'मे' महिना चालू होता आणि जुलै महिन्यात मला नोकरीवर रूजू व्हायचे होते. मधल्या काळात सतत बाबांचे आश्वासक महावाक्य मनी रुंजी घालत होते, ''मुली चिंता करू नको, मी आहे ना!'' आता टोकिओला जायची वेळ आली. टोकिओमध्ये माझी एक भारतीय मैत्रीण राहत होती. मी तिला दूरध्वनीवरून संपर्क केला, तिने भेटावयास बोलावले. तिकडे पोहोचल्यावर पुन्हा दूरध्वनीवरून संपर्कात तिने, काही कारणास्तव माझ्याबरोबर नाही येऊ शकत असे कळविले. त्याऐवजी, तिच्या एका मित्राला, तेथील एका रेल्वे स्थानकावर भेटावयास सांगितले. टोकिओ माझ्यासाठी अगदी नवीन शहर, नवीन प्रणाली, सगळं काही नवीन तरीही, ''निश्चयाचे बळ, करी ठेंगणे आभाळ,'' हा विश्वास मनात एकच दृढ संकल्प, ''बाबा आहेत ना!'' त्यासरशी ह्या वळणावरही सारे सुकर झाले. मैत्रीणीने सुचविलेल्या मित्राशी सुरळीत भेट झाली. भेटीदरम्यान, तुझ्यासारखेच घर मला हवंय असे त्याला सांगून मी फूकुओकाला परतले आणि तेथील दैनंदिन कामास मी लागले.

अचानक काही दिवसांनी त्या मित्राशी दूरध्वनीवरून संपर्क झाला. त्यात त्याने व्हिडिओ कॉलद्वारे एक घर दाखविले. घर माझ्या पसंतीस उतरले आणि लगेच मी संमती दिली. अखेर घर मिळाले. खरे पाहता, जपानमध्ये घर घेणारा माणूस समोर नसेल तर सौदा पक्का होत नाही, पण अशक्यही शक्य होताना मी 'याची देही, याची डोळा' अनुभवले. कारण, सोबत साधारण नव्हती. सर्वशक्तिवान परमात्मपित्याची होती. पावलोपावली आपल्या लेकराचा अनोळखी शहरात सांभाळ अशा रीतीने करतोय ह्याला उपमा नाही. हेही तेव्हा होते, जेव्हा आपण दृढ निश्चयाने सगळं काही परमेश्वरावर, त्या परमात्मा पित्यावर सोपवून 'तूच कर्ता आणि करविता' ह्या भावनेने (हृदयापासून) कर्म करतो, तेव्हा हे घडून येते त्याचा प्रत्यय येतो.

आता टोकिओला निघायची वेळ झाली. अतिवृष्टीमुळे विमानाला दोन तास उशीर आहे असे फूकुओकाहून टोकिओला निघताना समजले तरीही मन अगदी शांत आणि निश्चिंत! साडेनऊला येणारे विमान साडेअकराला आले. लगेच त्या मित्राला कळविले. मला पोहोचायला उशीर होतोय. अखेर टोकिओला पोहोचले. विमानतळावरून बाहेर आले. बघते तर काय शेवटची बस आणि शेवटची ट्रेन अक्षरशः डोळ्यासमोरून गेल्या. तेव्हा रात्रीचे साडेबारा झाले होते. त्या गडबडीतही मन शांत–स्थिर–समाधानी! त्यावेळी शिवबाबांचे मुरलीतले महावाक्य अगदी सहज हसत हसत मुखातून निघाले, 'जो होता हैं

(पृष्ठ क्र.२६ वर)



# मनुष्य सृष्टीरूपी अविनाशी कल्याणकारी ड्रामा

ब्र.कु. रामकृष्ण, वाशिम

ड्रामा अर्थात नाटक. रंगमंचावर होणाऱ्या नाटकांचे दोन किंवा तीन अंक (भाग) असतात. त्याचप्रमाणे परमात्म्याने दिलेल्या ज्ञानानुसार, या सृष्टिरूपी रंगमंचावर घडणाऱ्या अविनाशी नाटकाचेही चार अंक आहेत. ५००० वर्षांच्या कालावधीच्या या नाटकाचे संपूर्ण कल्पात ४ भाग – ४ युगे असतात. प्रत्येक युगाचा कालावधी १२५० वर्षांचा असून त्यात जीवन जगण्याच्या साधारणतः दोन अवस्था असतात. देवा तू सूत्री विश्वलाघवा असे एका ठिकाणी ज्ञानेश्वरमाउलींनी सांगून ठेवले आहे. त्यातील विश्वालाघव शब्द या जगरूपी नाटकाला उद्देशून म्हटले आहे.

१. सत्ययुग आणि त्रेतायुग : मनुष्य सृष्टिरूपी कल्याणकारी अनादि अविनाशी नाटकाच्या सुरुवातीची ही युगे. या कालावधीला स्वर्ग, बहिश्त अथवा हेवन म्हणतात. स्वर्ग हे काही वेगळे आकाशातले ठिकाण नाही, तर या पृथ्वीवरच घडणारा मनुष्य सृष्टिरूपी नाटकाचा अंक आहे. या काळात सर्व मनुष्यमात्र आत्म–अभिमानी असतात. अर्थात् त्यांना देहात वास करणारा आत्मरूपाची पूर्ण जाणीव असते. त्यामुळे देह–भानामुळे येणारे काम–क्रोध अहंकारादि विकार नसून ते निर्विकारी, अहिंसक, अनासक्त, पवित्र आणि संतुष्ट असतात.

२. द्वापरयुग आणि कलियुगः या कालावधीत मनुष्यास आत्म रूपाची जाणीव नाहीशी होऊन स्वतःला केवळ शरीर समजल्याने देहाशी निगडित दोष अथवा विकारांचा प्रभाव वाढतो. जेणेकरून असत्य, अपवित्रता, हिंसा, आसक्ती इत्यादी भाव मनुष्याचा ताबा घेतात.

ज्याप्रमाणे नाटकातील कलाकार हे आपल्या पात्राची भूमिका बजावतात, त्याचप्रमाणे या सृष्टिरूपी नाटकातील पात्रं अर्थात चैतन्य आत्मा. चैतन्य शक्ती आत्मा जन्म घेऊन, अर्थात पाच तत्त्वांनी बनलेले साकार (स + आकार) शरीर धारण करून आपापली भूमिका निभावतात. ज्याप्रमाणे प्रत्येक भूमिकेसाठी वेगळी वेशभूषा आणि रंगभूषा केली जाते, त्याचप्रमाणे प्रत्येक जन्मात आत्मा वेगळे शरीर धारण करतो.

सृष्टीच्या आदि काळात आत्मरूपाची जाणीव असलेले मनुष्य पुनर्जन्म घेत घेत आत्म्याचे भान विसरून स्वतःला देह समजू लागतात. द्वापारयुगाच्या काळात स्वतःची खरी ओळख विसरल्याने श्रेष्ठ/दिव्य अशा आत्मिक शक्तींची विस्मृती होते आणि अशाप्रकारे देह–अभिमानी झाल्याने ते काम–क्रोधादि विकारांचे गुलाम होतात. विकारांच्या प्रभावामुळे त्यांच्याकडून घडणारी कर्म देखील विकर्म किंवा पापकर्मात गणली जातात. याच कर्मांचे फलस्वरूप म्हणजे त्यांना विविध प्रकारच्या दुःखांना सामोरे जावे लागते. अशाप्रकारे द्वापारयुगापासून कलियुग अंतापर्यंत दुःखाचे प्रमाण वाढत जाऊन मनुष्यसृष्टीची अवस्था हळू हळू बिघडत जाऊ लागते.

ज्यावेळी सत धर्म अर्थात आदि सनातन दैवी धर्माची अतिग्लानी होते, त्यावेळी निराकार, त्रिमूर्ती परम पिता परमात्मा शिवाचे दिव्य अवतरण होते. परमात्मा शिवाची अन्य धर्मात देखील गॉड, अल्लाह, ईश्वर, जेहोवा, चिन–कान–सेकी, एको ओंकार अशी विविध नावे आहेत. एका वृद्ध, अनुभवी साधारण अशा मनुष्य देहाचा आधार घेऊन परमात्मा शिव आपले ज्ञान प्रदान करण्याचे कार्य करतो. १९३७ साली दादा लेखराज, ज्यांचे नामकरण स्वतः परमात्म्याने 'प्रजापिता ब्रह्मा' असे केले, त्यांच्या शरीरात परमात्मा शिवाचे दिव्य अवतरण झाले. शिव परमात्म्याने ब्रह्मा तनाद्वारे प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची स्थापना केली.

निराकार त्रिमूर्ती शिव परमात्मा हे सदा पावन

असल्यामुळेच पतित अशा मानव सृष्टीचे पावन सृष्टीमध्ये रूपांतर करण्याचे दिव्य कार्य कल्पाच्या अंतिम समयी करीत आहेत. ब्रह्मामुखाद्वारे परमात्म्याने शिकवलेला राजयोग अर्थात् परमात्म्याचे दिव्य स्मृतीत राहून आपले आत्मिक बल वाढवणे आणि दैवी गुण धारण करून स्वतःत परिवर्तन करणे याद्वारेच पतित दुःखी सृष्टीचे हे परिवर्तन शक्य होते. कलियुगी सृष्टीचे सत्ययुगी श्रेष्ठ सृष्टीत परिवर्तन करण्याचे कार्य सुरु असण्याच्या या कालावधीला संगमयुग असे म्हटले जाते.

या परिवर्तनानंतर येणाऱ्या सृष्टीच्या सुवर्णयुगास वर उल्लेखल्याप्रमाणे 'सत्ययुग' म्हटले जाते. सर्व प्रकारचे संपूर्णत्व आणि दिव्यत्व हे या युगाचे वैशिष्ट्य. या युगात मनुष्यात्मे आपल्या सर्वश्रेष्ठ स्थितीत असून निसर्ग देखील समृद्ध आणि सर्वतोपरी अनुकूल असतो. या काळातील मनुष्यात्म्यांना देव-देवता संबोधले जाते. कारण निराकार परमपिता परमात्म शक्तीद्वारे स्थापित सत्धर्माचे पालन केल्यामुळे सत्ययुग आणि त्यानंतरच्या त्रेतायुगात पाच विकारांचा कोणताही अंश नसतो. परिणामी समाजात दिव्यत्व, पावित्र्य, सुख आणि शांती असते.

यानंतरच्या काळात म्हणजे द्वापार आणि कलियुगात अनेक जन्म घेतल्यावर देह-अभिमान वाढीस लागून हळूहळू पाच विकारांचा पगडा वाढू लागतो. परमात्म्याने स्थापन केलेल्या शांती, प्रेम आणि पवित्रतेवर आधारित निर्विकारी देवी-देवता धर्माचा लोप होऊन आत्म्याची आध्यात्मिक शक्ती कमी होते. याच काळात अन्य धर्मस्थापकांद्वारे आत्मिक शक्तीने अनेक धर्म, पंथ, मठ, संस्था इत्यादी स्थापन होतात. सुरुवातीच्या काळात आपल्या सत्व अवस्थेत असलेले हे धर्म-पंथ देखील पुढे पुढे कलियुग अंतापर्यंत आपल्या तमो अवस्थेत येतात.

या संपूर्ण सृष्टिचक्राच्या कालावधीला एक कल्प म्हटले जाते.

सर्व धर्मीय मनुष्य आत्मे सार्वभौमिक मान्यतेनुसार एकाच निराकार त्रिमूर्ती परमपिता परमात्म्याची संतान असून परमधाम निवासी आहेत. त्यांचे स्वरूप, स्वधर्म, स्वदेश, धाम एकाच असते. कलियुगाचा अंत आणि सत्ययुगाचा प्रारंभ यामधील पुरुषोत्तम संगमयुगात शिव परमात्म्याने प्रजापिता ब्रह्माद्वारे दिलेले ईश्वरी ज्ञान आणि राजयोगाचे शिक्षण सर्वधर्मीय मनुष्यात्म्यांसाठी कल्याणकारी असून ते आपापल्या पुरुषार्थानुसार आपापल्या धर्मात श्रेष्ठ पद प्राप्त करू शकतात. पुरुषार्थानुसार त्यांचे ओज आणि तेजामधील फरकामुळे आणि वेगवेगळ्या संस्कारामुळे त्यांचे चेहरे वेगवेगळे दिसून येतात. शिव परमात्मा मनुष्य सृष्टीचे बीजरूप आहे. म्हणून या सृष्टीवरील त्याचे आगमनानंतर नवा सृष्टी वृक्ष म्हणजे नव्या सत्ययुगी सृष्टीचा पुन्हा प्रारंभ होतो. याप्रमाणे हे सृष्टिचक्र प्रत्येक कल्पात हुबेहूब (जसेच्या तसे) पुनरावृत्त होत राहते. म्हणूनच या सृष्टीचा अंत आणि प्रारंभ सांगितला जात नाही. हे सृष्टिचक्र सतत चालू असते.

अशाप्रकारे सृष्टीचे सत्ययुगापासून कलियुगापर्यंतचे अधःपतन आणि संगमयुगातील पुनरुत्थान याची प्रत्येक कल्पात जशीच्या तशी पुनरावृत्ती होते. अर्थात जे कर्म करू ते पुढील कल्पात पुनरावृत्त होते. तर मग या अनादि अविनाशी सृष्टिचक्रात चिंता-तणाव यामध्ये आपली शक्ती, वेळ, पैसे आणि जीवन व्यर्थ घालविण्यात काय अर्थ? त्यापेक्षा परमात्मा शिवाने शिकवलेल्या राजयोगाद्वारे जीवनात सुख-शांती आणि समाधानाची प्राप्ती करणे अधिक श्रेयस्कर नव्हे काय? राजयोग हा केवळ काही काळासाठी नसून ती एक जीवनपद्धती आहे. कर्म सिद्धांतानुसार चांगल्या आणि वाईट दोन्ही प्रकारच्या कर्मांचे फळ आपल्याला मिळतेच. पापकर्म म्हणजे काय, आणि पुण्य कर्माचा वास्तविक अर्थ काय, याचे ज्ञान परमात्म्याने प्रदान केले आहे. आपल्या पूर्वजन्मीच्या पापकर्मांचा हिशोब पूर्ण करण्याचा एक सहज मार्ग सांगितला आहे. आध्यात्मिकता म्हणजे केवळ गिरिकंदरात जाऊन ध्यान करणे नव्हे, तर रोजच्या आयुष्यात नित्य कर्म करत असताना परमात्म्याच्या स्मृतीमध्ये राहून आपले कर्म दिव्य कसे करता येईल याचे सहज मार्गदर्शन या ज्ञानाद्वारे आपल्याला प्राप्त होते. राजयोग आणि सृष्टिचक्राविषयी अधिक सखोल जाणून घेण्याकरिता आपण स्थानिक ब्रह्माकुमारी सेवाकेंद्राशी किंवा पाठशाळेशी संपर्क साधून सात दिवस रोज एक तासाचा निःशुल्क कोर्स करू शकता.

***



# तणावमुक्ती

ब्र.कु. पुष्पा, नाशिक

वैद्यकीय ज्ञान म्हणतं, अनेक आजार मनोकायिक आहेत म्हणजेच 'सायकोसोमॅटिक' आहेत. याचाच अर्थ मनाच्या स्थितीचा शरीरावर होणारा विपरीत परिणाम. उदाहरणार्थ उच्च रक्तदाब, हृदयविकार, त्वचारोग अशा अनेक व्याधींमध्ये चुकीचा आहार, अनुचित जीवनशैली याबरोबर मनातील घालमेलही तितकीच जबाबदार आहे असे सांगितले जाते. मग यापासून मुक्त व्हायचे असेल तर मन स्थिर ठेवण्यासाठी जे काही करायला हवे ते केले तर या व्याधींवर उपचार करण्यास मदत मिळेल हे नक्की !

सकारात्मक विचार करा असे अनेकदा आपण वाचतो, ऐकतो. सकारात्मक विचाराने जीवन सुखी, संपन्न, आनंदी बनू शकते. हे आपण जाणतो. पण प्रत्येक घटनेवर सकारात्मक पद्धतीने विचार करणे आपल्याला दरवेळी जमतेच का? ज्याने त्याने आपल्या मनाशी विचार करून पहावा. जेव्हा सकारात्मक विचार जमत नाहीत तेव्हा विचार अति वेगाने चालू लागतात. भविष्याबद्दल चिंता असतील तर त्याचे तणावात रूपांतर होते. भूतकाळाबद्दल चिंतन चालले तर ते व्यर्थ विचारांच्या यादीत गणता येईल आणि त्याचे ओझे मनाला थकविते. सकारात्मक विचार करण्यासाठी काही उपाय आहेत, जसे– सकारात्मक विचार हे सकारात्मक श्रवण, वाचन आणि चिंतनातून निर्माण होऊ शकतात. हे एका रात्रीत घडून येणारे परिवर्तन नाही हे सगळ्यांना पटतं. मात्र त्याची सुरुवात कुठेतरी व्हायला हवी. समस्या आल्यावर त्याचे उत्तर शोधणे, प्रयत्न करणे म्हणजे तहान लागल्यावर विहीर खोदण्यासारखंच आहे. त्याकरिता अध्यात्म मदत करते. नित्य श्रवण, नित्य चिंतन हे जीवनाचा अविभाज्य अंग बनलं तर तणाव निर्माण करणाऱ्या घटनांचे प्रभाव दुबळे ठरू लागतात.

सकारात्मक विचारांद्वारे तणावावर विजय मिळविण्याकरिता एखादे प्रेरणादायी उदाहरण डोळ्यासमोर ठेवले तरी मनाला उभारी मिळते. अमेरिकेत ट्विन टॉवर पडले तो प्रसंग आठवा. त्यानंतर कित्येकांच्या मुलाखती प्रसिद्ध झाल्या. कुणी सांगितलं माझी नेहमीची गाडी हुकली. मला उशीर झाला. कुणी सांगितलं घरातल्या अमुक गोष्टीमुळे किंवा रस्त्यावरच्या वाहतुकीच्या कोंडीमुळे मी उशिरा पोहोचलो इत्यादी. जेव्हा त्या छोट्या गोष्टीचा मोठा परिणाम दिसतो म्हणजे जीव वाचला तेव्हा आपण म्हणतो बरं झालं. उशीर झाला. त्यामुळे जीव वाचला. नाहीतर त्या दिवशी प्राण गमावू शकलो असतो. रोजच्या जीवनात अशाच प्रकारे विचार करून बघा. वरकरणी एखादी गोष्ट अहितकारी वाटली तरी त्यामागेही काहीतरी सुप्त कल्याणच दडले आहे हे मनाशी निश्चित करा. मग पहा तणावाची पकड कशी ढिली होत जाते.

आपण वेळेचे बाबतीत काटेकोर असतो आणि एखादी व्यक्ती सुनिश्चित वेळेवर नाही आली की आपल्या जीवाची घालमेल होते. तणाव वाढतो. कुणा विशेष व्यक्तीला भेटायचे असेल, वेळ दिली असेल तर अशावेळी परीक्षा बनून हे प्रसंग समोर उभे ठाकतात.

अशा वेळेस विचार करून बघा, हे एक भलंमोठं नाटक आहे. या नाटकांत प्रत्येकाची एक भूमिका आहे. ती भूमिका सुनिश्चित आहे. नाटकात कुणाला काय तर कुणाला काय भूमिका मिळाल्यामुळे जो तो आपापला अभिनय उत्तमरीत्या साकारतोय. या सगळ्याचा कुणी असा अर्थ घेऊ नये की वेळेच्या बाबतीतला बेशिस्तपणा समर्थनीय आहे. पण घटना घडल्यावर त्यावर चिंतन करून काय उपयोग ?

एका सर्वेक्षणात आढळून आले आहे की, मनुष्य साधारणपणे ६० ते ६५ टक्के विचार गतकाळाबद्दल करतो.

२५–३० टक्के भविष्याबद्दल करतो आणि खऱ्या अर्थाने वर्तमानाबद्दल ५–७ टक्के विचार करतो. प्रत्येकाने अंतर्मुख होऊन आपले विचार कुठल्या वर्गवारीत किती असतात ते पडताळावे. या नाटकातील माझी भूमिका काय आहे. माझ्याशी निगडीत असणाऱ्यांची भूमिका काय आहे यावर चिंतन करणे आवश्यक आहे. ब्रह्माकुमारी संस्थेत शिकवले जाते, या सृष्टीचक्ररूपी नाटकाचा एकूण कालावधी ५००० वर्षांचा आहे. एका कालचक्रास एक कल्प म्हटले जाते. या ज्ञानाचा आपल्या जीवनात तणावमुक्तीकरिता वापर करता येतो. जे घडून गेलं ते या नाटकाचा एक भाग होता. जे घडणार आहे तेही कल्याणकारी आहे... अशा विचारांचा पाया मजबूत केला तर, बदलत्या आव्हानात्मक परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या तणावावर उपाय सापडेल. जवळच्या ब्रह्माकुमारी संस्थेच्या शाखेत याबाबतचे ज्ञान निःशुल्क प्राप्त करा हेच कळकळीचे आवाहन!

***

(पृष्ठ क्र.२२ वरुन)

अच्छे के लिये होता है ।' आणि मन पुन्हा स्थिरावस्थेत कल्याणकारी शिवबाबांची सोबत आहे तर सगळ्या गोष्टींत कल्याणच सामवलंय.

मित्राचा निरोप आला, प्रत्युत्तरात रात्री इथेच थांबून सकाळी पहिल्या ट्रेनने येण्याचे कळवून टाकले आणि अजूनच हलके झाले. मन जराही दोलायमान झालं नाही, ना कसली फिकीर! आणि कोण आश्चर्य ! रात्री दीड वाजता तो मित्र, आपल्या सहकाऱ्याची गाडी घेऊन आला मला घरी नेण्यासाठी ! एवढ्या रात्री एकटी थांबणार म्हणून कोण करतोय ही सोय? ही काळजी? उत्तर एकच, 'माझे बाबा', शिवबाबा ! त्या परमात्म पित्याला आपल्या लेकराची काळजी, क्षणोक्षणी ह्या वळणावर मला आपल्या प्रेमाची ऊब देऊन सांभाळत होता. त्याच्या प्रेमाने मन भरून आले. नवख्या देशात, नवख्या वाटेवर, नवख्या वळणावर, वळणांवर भक्कम सोबत, जणू काही धूसर मार्गावर लख्ख प्रकाश करणारी.

पहाटे अडीचला सुखरुप मी निवडलेल्या घरी पोहोचले आणि बाबांच्या आठवणीत शांत झोपी गेले. फूकुओकाहून सगळे सामान आणि कपडे पाठवून, फक्त एक पिशवी घेऊन मी टोकिओला आले होते. सकाळी उठल्यावर काय करायचे हा प्रश्न; पण पुन्हा मन शांत. सकाळी उठले आणि दारावरची घंटी वाजली. दार उघडून बघते तर काय ! सगळच्या सगळं सामान अगदी माझ्या पुढ्यात घरपोच मिळाले !

कितीतरी अडथळे आले पण तरीही परमेश्वरावरील अतूट, अटळ अगाध विश्वास आणि मनाची शांत, स्थिर आणि बेफिकीर बादशाहची स्थिती, हे सगळं पाहता मनात विचार उमटला, जणू काही शिवबाबांनी मला फुलासारखे जपून सुरक्षित घरी आणले. कितीही धन्यवाद केले शिवबाबांचे, तरी कमीच... तरीही, कोटी–कोटी धन्यवाद ! बाबा !!

***

## संगदोष

रोजच्या ज्ञानमुरलीत आपण ऐकतो, संगदोषापासून आपला बचाव करा. साधकाने या गोष्टीची विशेष काळजी घेतली पाहिजे. ढोबळमानाने अर्थ घेतला तर वाईट सवयी असलेल्या व्यक्तीची संगत न करणे म्हणजे संगदोषापासून दूर राहणे. मात्र परमात्मा शिव म्हणतात, राजयोग्याने ५ प्रकारच्या संगदोषापासून स्वतःचा बचाव केला पाहिजे.

१) मायेचा संग – ५ विकारवश, (काम क्रोधादि...) उत्पन्न होणाऱ्या विचारांचा संग. जसे सीतेला अरण्यात सुवर्णमृगाची भुरळ पडली तसे साधकाला अनावश्यक वस्तूंची लालसा उत्पन्न होणे ही देखील माया आहे.

२) संबंधितांचा संग– नातेवाईक , मित्र–परिवार यांविषयी प्रेम असावं; पण मोह नको. जिथे मोह आहे तिथे दुःख आहे.

३) वाणीद्वारे संगदोष– कुणाच्या कटू वचनांचा मनावर प्रभाव पडतो आणि मन विचलित होते. हा देखील संगदोष मानला जातो.

४) अन्नदोष– तामसिक भोजन, कदान्न, परान्न याच्या सेवनाने बुद्धी मलिन होते म्हणून हा संगदोष टाळायलाच हवा.

५) कर्माचा संग– स्वतःच्या पूर्वकर्माचे ओझे आपल्याला सोडत नाही. त्यासाठी प्रखर अशी राजयोगाची साधना हवी. तसेच दुसऱ्याच्या कर्मांकडे पाहून आपल्या चित्तवृत्ती विचलित झाल्या तर तोही कर्माचा संग घडला असे म्हणावे.

अशा सगळ्या असंगाचा संग नको रे बाबा! म्हणून एक परमात्म्याचा संगच करण्याचे ध्येय अध्यात्मात हवे. (आधार– अव्यक्त वाणी १४/०६/१९७२)

# "आध्यात्मिक प्रकाशस्तंभ दादी प्रकाशमणी"

**ब्र.कु. विद्या, पुणे**



अध्यात्म प्रज्ञा राजयोगिनी दादी प्रकाशमणी एक सशक्त विदुषी होत्या. "स्त्री ही शक्ती स्वरूपा आहे. स्त्री मधील शक्ती जर आध्यात्मिकतेद्वारा जागृत झाली तर ती महान क्रांतीची नायिका बनू शकते हे दादीजींच्या जीवनातून सिद्ध होते.. स्त्री ही शीतला, दुर्गा, सरस्वती आणि संतुष्टतेची देवी, संतोषी देवी बनू शकते हे त्यांच्या जीवनातून अनेकांनी अनुभवले."

ज्याप्रमाणे मातेच्या दुधामुळे लहान मूल सशक्त होते त्याप्रमाणे या विश्वातील अनेक व्यक्तींना दादींच्या निःस्वार्थ प्रेमामुळे जी शक्ती मिळाली, त्यामुळे अनेकांचे जीवन परिवर्तन झाले. दादींजींच्या खंबीर नेतृत्वात भारत आणि जगभरातील १४० देशातील अनेकांनी विश्व सेवेसाठी जीवन समर्पित केले. दादीजींची समर्पण वृत्ती पाहून संस्थापक प्रजापिता ब्रह्मा बाबांनी देह त्याग करण्यापूर्वी संस्थेची जबाबदारी दादींच्या हाती सोपवली. तेव्हापासून दादीजींच्या नेतृत्वात "इवलेसे रोप लावियेले द्वारी तयाचा वेलू गेला गगनावरी" या उक्ती प्रमाणे ईश्वरीय विश्व विद्यालयाचा प्रसार जगभरात झाला.

'दादीजी वरदानीमूर्ती' होत्या. दादीजींच्या प्रत्येक संकल्पामध्ये, प्रत्येक शब्दांमध्ये, प्रत्येक वाक्यामध्ये वरदानी शक्ती होती. एकदा मी मधुबन (मा. आबू) येथे सेवेला गेले होते. त्यावेळेला माझा धाकटा मुलगा, अमीत अडीच तीन वर्षाचा होता. मी त्याला घेऊन गेले होते. तो लहानपणपासूनच गाणी छान म्हणत असे. मुरली झाल्यावर दादींनी त्याला गाणं म्हणायला सांगितलं त्याप्रमाणे त्यानी "मीठे बच्चे मीठे बच्चे बोल ये कितने मीठे है" हे गाणं म्हटलं. नंतर आम्ही ओमशांती भवनमधून पांडव भवन मध्ये आलो, तिथे दादी बसल्या होत्या आणि काही कन्या, टीचर बहिणी दादींच्या बरोबर होत्या. अमीतला बघून त्या सगळ्या म्हणायला लागल्या दादीजी, मीठे बच्चे मीठे बच्चे आ गया. मग दादींनी आम्हाला त्यांच्याजवळ बोलवलं आणि त्याला गायला सांगितलं हे सगळं मी थोडीशी लांब उभी राहून बघत होते तेव्हा दादीजी माझ्याकडे बघून मला दृष्टी देत म्हणल्या "इसकी माँ बहुत मीठी है" तेव्हापासून मी जागरूक असते की दादीने मला हे वरदान दिलेले आहे.

वीस वर्षांपूर्वीचा प्रसंग – दादींजीनी जोडप्यांच्या योगतपस्येचा कार्यक्रम (भट्टी) मधुबनला ठेवला होता. पावसाळ्याचे दिवस होते आणि आम्ही दहा हजार जोडपी त्या कार्यक्रमात होतो. कार्यक्रम खूप छान आणि शक्ती संपन्न झाला. दादींनी सगळ्यांचे खूप कौतुक केलं की "घरगृहस्थाश्रमात राहून तुम्ही आपल्या घराला पवित्र गृहस्थाश्रम बनवला आहे. अशक्य गोष्ट तुम्ही शक्य करून दाखवली आहे." कार्यक्रम संपायच्या वेळेला आम्हाला गाणं म्हणायला सांगितलं. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे आम्ही दोघांनी एक नवीन गीत बनवून सादर केलं, "प्यारे बाबा यु ही तेरे प्यार की बरसात हो" हे गाणं गाऊन झाल्यावर दादीने आम्हाला दोघांनाही बोलवलं आणि खूप शक्तीसम्पन्न दृष्टी दिली. त्यानंतर लगेचच "आनंद सरगम" हा अल्बम बनवण्यासाठी आम्ही निमित्त झालो. त्यात ते गायलेले गीतही आहे. या अल्बमचे प्रकाशन स्वतः अव्यक्त बापदादांनी केले. त्यामध्ये आम्ही दोघांनी आणि आमच्या दोन्ही मुलांनी गायले असल्याने, सर्व परिवाराला बाबांची शक्तीसंपन्न दृष्टी लाभली. तर अशा रीतीने दादीचे वरदान, दादींची दृष्टी त्याच्यातून ही मोठी सेवा घडली आणि सर्व परिवाराला बाबांची दृष्टी आणि बाबांची शक्ती मिळाली.

दादीजी मुरली पण इतकी छान विशद करायच्या की बाबांचे ज्ञान दादींच्या तोंडून ऐकायला खूपच छान वाटायचे. तसेच दादींचे बाबांवरचे प्रेम बघायला ऐकायला सुद्धा खूप

छान वाटायचे. मधुबन मध्ये गेल्यानंतर दादींकडून मिळालेले निःस्वार्थ प्रेम सशक्त संगोपन हे सर्व काही अवर्णनीय होतं. एकदा असं झालं– मी सेवेसाठी गेले होते. पांडवभवनच्या अंगणात दादीजी खुर्चीवर बसल्या होत्या आणि अमित तेथे खेळत होता. खेळता खेळता अमित दादींना म्हणाला ''दादीजी आप पुना में हमारे घर जरूर आना'' एक क्षण थांबून दादींनी विचार केला आणि म्हणाल्या 'हा आऊंगी' मी सर्व ऐकत होते, मला इतका आश्चर्य वाटलं की दादीजी इतकी महान, इतकी श्रेष्ठ, इतकी महारथी व्यक्ती आणि आपल्या घरी येण्यासाठी हो म्हणाल्या!! मी खूप गदगद झाले. त्यानंतर मधे काही वर्षे गेली आणि २५ ऑगस्टचा तो दिवस उजाडला. त्या दिवशी दादीजींनी भौतिक देहाचा त्याग केला. त्यावेळेला मी पुण्यात होते आणि काही अपरिहार्य कारणांनी मला, त्या वेळेस माउंट आबूला जाणं शक्य नव्हतं. मग मी असा विचार केला की, ड्रामानुसार मी पुण्यात थांबले आहे तर दादींजींविषयी खूप छान लेख लिहून सकाळ पेपर, जो पुण्यात घराघरांमध्ये जातो त्या पेपरला लेख देऊया. आपलं पुण्यात असणं सफल करूया. लेख लिहितांना दादींनी जे आध्यात्मिक संगोपन दिलं, त्याचे एक एक प्रसंग डोळ्यासमोर येत होते, दादींबद्दलचे प्रेम, हे सगळं त्या लिखाणात उतरत होतं आणि तो लेख लिहून मी पेपरला देऊन आले. तोपर्यंत मधुबनवरून सांगण्यात आलं, तसंच सेंटरवरूनही बहेनजींकडून सांगण्यात आलं की अमुक दिवशी दादींच्या निमित्त आपण नैवेद्य लावायचा आहे. आमच्याकडे पाठशाळा असल्यामुळे त्या दिवशी आम्ही दादीजींच्या निमित्त बाबांना नैवेद्य लावत असताना मला प्रत्यक्ष अनुभव आला की दादी आल्या आहेत. दादीजी दारापाशी उभ्या आहेत. मी दादींचे फुले देऊन स्वागत केले. हात धरला आणि दादींना आत घेऊन आले, पाठशाळेत. हे सगळं मी प्रत्यक्ष अनुभव करत होते. मी दादींना दाखवलं ''दादीजी इथे आम्ही मुरली वाचतो, इथे आम्ही नैवेद्य बनवतो, इथे आम्ही योग करतो'' दादीजी खूप रस घेऊन ते ऐकत होत्या, मला दृष्टी देत होत्या. समोर सगळेजण बसले होते नैवेद्य दाखवताना योग करत होते. दादीजी खुर्चीवर येऊन बसल्या, दादींनी सगळ्यांना दृष्टी दिली आणि दादीजी अव्यक्त झाल्या. हा अनुभव इतका प्रत्यक्ष घडतंय असा होता की मला खात्री पटली की आज दादीजी घरी, पाठशाळेत येऊन गेल्या. काही वर्षांपूर्वी त्या म्हणाल्या होत्या ''हो मी येईन'' आणि आज त्या येऊन गेल्या. अव्यक्त स्थितीतही येऊन प्रेम, शक्ती रूपी संगोपन देऊन गेल्या. त्याच दिवशी दादींवरती लिहिलेला लेख सकाळ मध्ये छापून आला आणि बारा तेरा लाख लोकांपर्यंत पोहोचला. त्या दिवसानंतर सकाळ पेपर मधली सेवा, न्युज पेपरर्स द्वारा मीडियाची सेवा वाढली. मग इतर पेपर्स मधली सेवाही वाढली. दादीजी आल्या आणि दादींनी सेवेचं मोठं क्षेत्र उघडून दिलं. अशा वरदानी दादीजी, त्यांचं निःस्वार्थ प्रेम, त्यांनी दिलेलं सशक्त संगोपन, त्यांच्याकडून मिळालेली शक्ती हे इतकं काही भरपूर आहे की साऱ्या कल्पामध्ये त्याची परतफेड करायची ठरवलं तरी ते कमीच आहे. दादीजींसाठी ''ए माँ तेरी सुरत से अलग भगवान की सूरत क्या होगी!'' या पंक्ती चपखल बसतात.

***

**ज्ञानमुरलीत अनेकदा ब्रह्मावत्स एक शब्द ऐकतात, साधकाची अवस्था 'एकरस' हवी. याकरिता ज्ञानमुरलीत काय काय उपाय दिले आहेत ?**

१) संगदोषापासून आपला सांभाळ आपणच करणे.

२) भोजन एकरस असावे.

३) कुणाचेही अवगुण न पाहणे.

४) ईश्वरी सेवेत स्वामित्व आणि बालकत्वाच्या भूमिकेचा समन्वय साधणे. स्वतःच्या कर्मेंद्रियांचे स्वामित्व आणि आपण ईश्वराचे पुत्र आहोत याचे भान कायम बाळगणे.

ज्यांना यावर 'विचारसागरमंथन' करायचे असेल त्यांच्यासाठी हे उपयुक्त बौद्धिक खाद्य ठरावे हीच शुभेच्छा.

(संदर्भ– अव्यक्त वाणी २२/०१/१९७१)



दिल्ली गुरूग्राम : डॉ. दीपक हरके यांना सन्मानित करताना भारतीय नौसेनेचे अधिकारी भ्राता स.न. घोरमडे, ब्र.कु. फाल्गुनी व ब्र.कु. ख्याती



रविवार पेठ, पुणे : गुरुपौर्णिमानिमित्त आयोजित कार्यक्रमात ब्र.कु. रोहिणी यांचा सत्कार करताना, हास्य क्लब शाहू उद्यानचे सभासद



वडगाव (मावळ) : आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त ब्र.कु. स्नेहा यांचा सन्मान करताना नेहरू विद्यालयाचे शिक्षक



डोंबिवली : आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त ईश्वरी भेटवस्तू दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र.कु. शकू, रूपाली शाईवाले, डॉ. निखील सासने, भ्राता संजय पिसे व अन्य मान्यवर



पूर्णा (परभणी) : अमृत महोत्सव अंतर्गत कार्यक्रमात वृक्षारोपण करताना ब्र.कु. प्रणिता, भ्राता संतोष मुगटकर



पाटण (सातारा) : उपनगराध्यक्ष भ्राता सागर पोतदार आपले मनोगत व्यक्त करताना, मंचासीन नगरसेवक भ्राता राजेंद्र राऊत, ब्र.कु. विद्या

Registration No. : MAHMAR/2007/21914



ठाणे चेकनाका : नवनिर्वाचित मुख्यमंत्री भ्राता एकनाथ शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना ब्र.कु. सरला, ब्र.कु. हीना, ब्र.कु. ज्योत्स्ना व ब्र.कु. संदीप



पोर्वरीम गोवा : केंद्रीय मंत्री भ्राता श्रीपाद नाईक यांचा सत्कार करताना ब्र.कु. शोभा व ब्र.कु. वनिता



ऐरोली : विश्व पर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रमात ईश्वरी संदेश देताना ब्र.कु. मीना, ब्र.कु. शीतल




वाशी : राष्ट्रीय डॉक्टर दिवसानिमित्त कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. ब्र.कु. अशोक मेहता, ब्र.कु. शीला व उपस्थित मान्यवर.



विक्रोळी : राष्ट्रीय डॉक्टर दिवसानिमित्त डॉक्टरांचा सन्मान करताना ब्र.कु. नीलिमा व ब्र.कु. जयश्री



देऊळगावराजा (बुलढाणा) : विश्वपर्यावरण दिनानिमित्त कार्यक्रमात ईश्वरी संदेश देताना ब्र.कु. सुनंदा व उपस्थित मान्यवर माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर, भ्राता मोरेश्वर मिनसे व अन्य